## संजय राऊत काँग्रेसही संपवत आहेत - संजय निरुपम



**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंतर्गत वादांमुळे महाविकास आघाडीमध्येही मतभेद निर्माण झाल्याची चिन्हं आहेत. त्यातच मुंबई उत्तर पश्चिम मतदारसंघात अमोल किर्तीकरांना उमेदवारी मिळाल्याने काँग्रेसचे संजय निरुपम संतापले आहेत. हाच संताप त्यांनी आज पुन्हा व्यक्त केला. ते आज एका मुलाखतीत बोलत होते. संजय राऊतांनी शिवसेना संपवली, असे वाटते का, असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर ते म्हणाले, संजय राऊतांनी स्वतःची शिवसेना संपवली, राष्ट्रवादी संपवली आणि आता ते आमची काँग्रेसही संपवत आहेत. त्यांच्याकडे काही नाहीय. त्यांचे मतदार किती हेही माहीत नाही. तरीही जबरदस्ती करून ते आमच्याकडून जागा घेत आहेत. ठाकरे गटाची सध्या काय ताकद आहे, हे कोणीही काही सांगू शकत नाही, असेही ते म्हणाले.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २५५
www.ramprahar.com

बुधवार, ३ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २







# किमान तीन लाखांची आघाडी घेऊन श्रीरंग बारणे पुन्हा खासदार होतील

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विश्वास

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रत्येक कार्यकर्ता एकरूप होऊन काम करणार आहे, त्यामुळे महासंसदरत्न खासदार श्रीरंग बारणे यंदाच्या निवडणुकीत किमान तीन लाखांच्या मतांची आघाडी घेऊन विजयी होतील, असा विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २) येथे व्यक्त केला. मावळ लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार व विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी मंगळवारी पनवेल येथे भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या वेळी झालेल्या छोटेखानी बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्रकाश बिनेदार, श्रीनंद पटवर्धन, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, चंद्रशेखर सोमण, रमेश गुडेकर, प्रथमेश सोमण यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, येथील काम फक्त निवडणुकीपुरता नाही तर वर्षाचे बाराही महिने अविरतपणे चालते आणि त्या अनुषंगाने कार्यकर्ता सज्ज असतो. त्यामुळे बिनधास्त रहा, या वेळी मागील निवडणुकीपेक्षा जास्त मताधिक्य मिळवून देऊ, असेही त्यांनी आश्वासित केले. लोकसभेचा सदस्य म्हणून खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारच्या माध्यमातून कामे केली, जनसंपर्क वाढवला त्यामुळे कामाचा खासदार म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. घाटमाथ्याहून तुम्ही मताधिक्य घेऊन येणार आणि त्यामध्ये आमच्याकडून मतांची जास्त आघाडी देणार असून एकूणच तीन लाखांपेक्षा जास्त मतांच्या फरकाने खासदार श्रीरंग बारणे निवडून येणार आहेत आणि हा महाराष्ट्रातील सर्वांत चांगला निकाल असेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### यंदाच्या निवडणुकीत मतांची आघाडी दुपटीने देणार -आमदार प्रशांत ठाकूर

आमदार प्रशांत ठाकूर या वेळी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा वर्षांत केलेले काम सर्वसामान्य नागरिकापर्यंत पोहचविण्याचे काम कार्यकर्त्यांनी केले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा नरेंद्र मोदीजी पंतप्रधान होणार असून मोदींची गॅरंटी प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपण स्वतः उमेदवार आहोत असे समजून काम करा, असे आवाहन केले. तसेच मागील वेळी पनवेल विधानसभा मतदार संघातून ५६ हजार मतांची आघाडी दिली होती ती या निवडणुकीत दुपटीने देणार असल्याचेही त्यांनी या वेळी नमूद केले.

खासदार श्रीरंग बारणे यांनी आपल्या मनोगतात, या परिसरात मागील निवडणुकीत माझ्या निवडणुकीची धुरा लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांभाळली आणि मतांची आघाडी मिळवून विजयी केले. त्यामुळे पुन्हा एकदा या विभागातून मताधिक्य मिळेल यात तिळमात्र शंका नसल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली काम करत असताना विविध योजना विकासकामे अंमलात आणली. सरकारची कामे लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाने देशाला जगात मानाचे स्थान मिळवून दिले, त्यामुळे पुन्हा एकदा मोदी सरकार ही देशाची गरज आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी या ठिकाणी विकासाचा आलेख उंचावला त्यामुळे त्यांच्या कामातून मतांची आघाडी मिळेल, असेही त्यांनी या वेळी अधोरेखित केले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रास्ताविकात म्हटले की, पुन्हा एकदा प्रचंड मतांनी विजयी करायचे आहे आणि त्यासाठी कार्यकर्ते सज्ज झाले आहेत. बुथ स्तरावर बैठका आणि त्या अनुषंगाने काम करण्यात आले आहे. अब कि बार ४०० पार हा नारा सर्वांच्या नसानसात भिनला आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली जास्तीत जास्त मते मिळवण्याचा प्रयत्न असणार असून प्रत्येक कार्यकर्ता झोकून काम करणार आहे.

# लोकसभा निवडणुकीसाठी भाजपचे बूथ विजय अभियान

■ प्रत्येक बूथवर ३७०मते वाढविण्याचा निर्धार

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत अब की बार ४०० पार ही घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी भारतीय जनता पक्षाने प्रत्येक बूथवर ३७० मते वाढविण्याचा निर्धार केला आहे, अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सह मुख्य प्रवक्ते विश्वास पाठक यांनी मंगळवारी (दि. २) दिली. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत पाठक बोलत होते. प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन या वेळी उपस्थित होते. यासाठीचे बूथ विजय अभियान बुधवार (दि. ३)पासून सुरू होणार असून हे अभियान सहा दिवस चालणार आहे, असेही पाठक यांनी सांगितले.

पाठक म्हणाले की, विधानसभा पातळीवर पक्षाच्या बूथ स्तरीय कार्यकर्त्यांचे तसेच पन्नास प्रमुखांचे मेळावे या अभियानात आयोजित केले जाणार आहेत. मागील तीन निवडणुकीतील



मतदानाच्या आकडेवारीचा आढावा घेऊन यावेळच्या निवडणुकीसाठी मतदानाचे उद्दिष्ट निश्चित केले जाणार आहे. या अभियानात प्रत्येक बूथवर मागच्या निवडणुकीपेक्षा ३७० मते वाढवण्यासाठी विविध उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. या अभियानात समाजातील विविध घटकांपर्यंत पोहचण्याचे लक्ष्य आहे, असेही पाठक यांनी नमूद केले. **(पान २ वर..)**

# खासदार सुनील तटकरेंसाठी महायुतीचा होम टू होम प्रचार

**पाली : प्रतिनिधी**

महायुतीचा प्रत्येक उमेदवार मोठ्या मताधिक्याने जिंकला पाहिजे यासाठी महायुतीतील प्रत्येक घटक पक्ष, नेतेमंडळी, पदाधिकारी जोमाने कामाला लागले आहेत. रायगड मतदारसंघात प्रचाराची रणनीती ठरली असून होम टू होम प्रचार करून सुनील तटकरे यांना पुन्हा खासदार करण्यासाठी महायुतीने कंबर कसली आहे.

रायगड लोकसभा मतदारसंघात महायुतीचे सुनील



तटकरे, तर महाविकास आघाडीचे अनंत गीते यांच्यात मुख्य लढत होणार आहे. आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना युवा सेना प्रमुख संजय म्हात्रे व पदाधिकारी यांनी ग्राउंडवर प्रचारास सुरुवात केली आहे.

या वेळी आमदार अनिकेत तटकरे, युवा सेना जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे, पेण तालुकाप्रमुख तुषार मानकवळे, संपर्कप्रमुख यशवंत मोकल, शहर प्रमुख दिनेश पाटील, युवा सेना तालुकाप्रमुख रोहन म्हात्रे आदी उपस्थित होते.

**(सविस्तर वृत्त पान ५ वर..)**

## निवडक

### गडचिरोलीमध्ये चकमकीत आठ नक्षलवादी ठार

**गडचिरोली :** गडचिरोली कोरचोली चकमकीत आतापर्यंत आठ नक्षलवादी ठार झाल्याची मोठी माहिती समोर आली आहे. चकमक स्थळावरून आठ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. डीआरजी, सीआरपीएफ कोब्रा आणि बस्तर बटालियनच्या जवानांमध्ये अजूनही चकमक सुरू आहे. मंगळवारी सकाळी ६ वाजल्यापासून नक्षलवाद्यांसोबत जवानांची चकमक सुरू आहे. चकमकीत अनेक स्वयंचलित शस्त्रे जप्त करण्यात करण्यात आली आहेत.

### सोलापूरचा पारा ४२ अंशांवर; वाढत्या उष्म्याने लोक त्रस्त

**सोलापूर :** एरव्ही प्रखर उन्हाळ्यासाठी ओळखल्या जाणाऱ्या सोलापुरात यंदाचा उन्हाळा अधिक त्रासदायक ठरत आहे. मागील आठवडाभर तापमानाचा पारा ४१ अंश सेल्सियसच्या पुढेच सरकत असताना मंगळवारी (दि.२) प्रथमच ४२ अंशांवर तापमान मोजण्यात आले. वाढत्या उष्म्यामुळे सोलापूरची वाटचाल आता 'शोला'पूरच्या दिशेने होऊ लागली आहे. सकाळी नऊपासून उन्हाचे चटके बसत असून दुपारी रस्त्यावर उन्हाच्या झळा जास्त त्रासदायक ठरत आहेत.

# भारताला अस्थिरतेकडे घेऊन जाण्याचे काम काँग्रेस करतेय

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताला अस्थिरतेकडे घेऊन जाण्याची काँग्रेसची इच्छा आहे. कर्नाटकातील एका मोठ्या काँग्रेस नेत्याने देशाचे तुकडे करण्याची भाषा केली. त्याला शिक्षा देण्याऐवजी काँग्रेसने निवडणुकीचे तिकीट दिले, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर हल्ला चढवला. एवढेच नाही तर, या वेळी पंतप्रधान मोदी यांनी 'काँग्रेस के शहजादे' म्हणत राहुल गांधींवरही हल्ला चढवला. ते लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उत्तराखंडमधील रुद्रपूर येथे मंगळवारी एका रॅलीला संबोधित करत होते.



मोदी म्हणाले, आपण भारताला जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनवण्याची गॅरंटी दिली आहे. आता तिसऱ्या टर्ममध्ये आणखी एक मोठे काम करणार आहे. आपल्याला २४ तास वीज मिळावी, वीज बील शून्य व्हावे आणि वीजेपासून आपली कमाईही व्हावी, असे माझे लक्ष्य आहे. तसेच, पुढच्या टर्ममध्ये भ्रष्टाचाऱ्यांवर आणखी कठोर कारवाई होईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

आपण पीएम सूर्य घर मोफत वीज योजना सुरू केली आहे. यामध्ये छतावर सोलर पॅनल बसवण्यासाठी सरकार मदत करत आहे. एका मध्यमवर्गीय कुटुंबाला ३०० युनिट वीज लागते. ही वीज मोफत मिळेल, अधिक वीज तयार झाल्यास, सरकार विकत घेईल आणि तुमची कमाईही होईल. यानंतर पंतप्रधान थोडे थांबले आणि त्यांनी जनतेला विचारले, आपण झीरो बिल योजनेचा लाभ घेणार का? त्यासाठी ॲप्लीकेशन करा काम सुरू आहे.

पंतप्रधान म्हणाले, काँग्रेसच्या राजघराण्यातील 'शहजाद्याने' घोषणा केली आहे, जर देशात तिसऱ्यांदा भाजपचे सरकार निवडून आले तर तर आग लागेल. ६० वर्षे देशावर राज्य करणारे १० वर्षे सत्ते बाहेर काय राहिले, आता देशात आग लावण्याची भाषा करत आहेत. खरे तर, काही दिवसांपूर्वी दिल्लीच्या रामलीला मैदानावर झालेल्या विरोधकांच्या सभेत बोलताना राहुल गांधी म्हणाले होते की, 'नरेंद्र मोदी या निवडणुकीत मॅच फिक्सिंग करण्याचा प्रयत्न करत आहेत. ४०० ची घोषणा आहे, मॅच फिक्सिंग केल्याशिवाय, हे १८० पारही जाऊ शकत नाहीत. जर भारतात भाजपने मॅच फिक्सिंगची निवडणूक जिंकली आणि त्यानंतर त्यांनी संविधान बदलले, तर या संपूर्ण देशात आग लागेल. मी जे म्हटले आहे, ते लक्षात असू द्या.'

रॅलीला संबोधित करताना मोदी म्हणाले, त्यांना निवडून-निवडून साफ करा. या वेळी त्यांना मैदानात थांबू देऊ नका, असे आवाहन केले.

# नवी मुंबईत तीन कंपन्यांना आग

## कोट्यवधींचे नुकसान

**नवी मुंबई :** येथील पावणे -खैरणे एमआयडीसीमधील नवभारत इंडस्ट्रियल केमिकल कंपनीला मंगळवारी (दि. २) सकाळी भीषण आग लागली. आगीचे लोट पसरून बाजूलाच असलेल्या गोएंका फूडस आणि जस्मिन प्रिंटर्स या कंपन्यांनाही बसला. त्या कंपन्याही आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या. यात सुदैवाने जीवितहानी झाली नाही, मात्र तिन्ही कंपन्यांतील कोट्यवधी रुपयांची वित्तहानी झाली आहे.

रात्री उशीरापर्यंत ही आग विझविण्यात नवी मुंबईतील अग्निशमन दलाला यश आले. आगीमुळे अर्धे शहर आकाशातील काळ्या धुराने व्यापून गेले होते. सध्या प्रचंड उकाडा वाढल्याने शॉर्ट सर्किटसारख्या घटना वाढू लागल्या आहेत. त्यातून ही आग लागली असावी, असा अंदाज लावला जात आहे.



# सांगलीमध्ये ट्रॅक्टर अपघातात चार ऊसतोड मजुरांचा जागीच मृत्यू

**सांगली : प्रतिनिधी**

रत्नागिरी-नागपूर महामार्गावर सांगली जिल्ह्यातील आगळगाव फाटा येथे भीषण अपघात झाला आहे. ट्रॅक्टरला भरधाव येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात चारजण ठार झाले, तर आठ जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये दोन महिला एक पुरुष आणि एक लहान मुलीचा समावेश आहे. जखमी यांच्यावर मिरजेच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ऊसतोडी संपवून ऊसतोड मजूर ट्रॅक्टरमधून परत मंगळवेढ्याकडे निघाले होते. कवठेमहांकाळ तालुक्यातील आगळगाव फाटा येथे भरधाव येणाऱ्या ट्रकने ट्रॅक्टरला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात चारजण ठार झाले तर आठ जण गंभीर जखमी झाले. जखमींवर मिरज शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहे. दरम्यान, पालकमंत्री डॉ. सुरेश भाऊ खाडे यांनी मिरज सिव्हीलमध्ये येऊन रुग्णांची विचारपूस केली. रुग्णांवर आवश्यक ते सर्व उपचार तत्काळ करण्यात यावेत. आवश्यकता असेल, तर तज्ञ डॉक्टरांना उपचारासाठी पाचारण करण्यात यावे, असे आदेश या वेळी खाडे यांनी दिले आहेत.

# युथ आयकॉन बनलेला आयुष्मान खुराना आता निवडणूक आयोगाचा करणार प्रचार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बॉलिवूड अभिनेता आयुष्मान खुराना हा आपल्या वैविध्यपूर्ण भूमिकांसाठी ओळखला जातो. आयुष्मान खुराना अनेकदा सामाजिक मुद्यावरही भाष्य करतो. आता आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयुष्मानला मोठी जबाबदारी मिळाली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने आयुष्मान खुरानाला युथ आयकॉन म्हणून नियुक्त केले आहे. आता आयुष्मान खुराना आता नागरिकांना, तरुणांना मतदानासाठी आवाहन करणार आहे.



केंद्रीय निवडणूक आयोगाने आयुष्मान खुरानाचा व्हिडीओ रिलीज केला. या व्हिडिओमध्ये आयुष्मान खुराना लोकांना मतदानासाठी आवाहन करताना दिसत आहे. आगामी २०२४ लोकसभा निवडणुकीत तरुणांना मतदान करण्यासाठी आवाहन करण्यासाठी आणि संवेदनशील करण्यासाठी आयुष्मान खुराना यांची निवड भारतीय निवडणूक आयोगाने केली आहे. या मोहिमेद्वारे आयुष्मान देशातील तरुणांना विनंती करेल की त्यांनी पुढे येऊन संसदेत देशाचे पुढचे नेते निवडण्यासाठी आपला हक्क बजावावा.

या व्हिडिओमध्ये आयुष्मान मतदान न करण्याच्या अनेक कारणांची चर्चा करताना दिसत आहे. एक मतही दिले नाही तर काय होईल, असे लोकांना वाटते. मतदान न करण्यासाठी १०१ कारणे आहेत, पण मतदान करण्यासाठी एकच कारण पुरेसे आहे आणि ते म्हणजे आपली जबाबदारी, देशासाठी आणि आपल्या भविष्यासाठी, असे आयुष्मान खुराना सांगताना दिसत आहे.

आयुष्मानने सांगितले की, प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा आणि राष्ट्र निर्माणाच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे. जागरुक नागरिकाचे हे कर्तव्य असल्याचे त्याने म्हटले. प्रत्येक मत महत्त्वाचे असून लोकशाही देशात मतदानाचे अधिकार बजावणे हे सशक्तिकरणाचे प्रतीक असल्याचेही त्याने सांगितले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विदर्भात सभांचा धडाका

**नागपूर : प्रतिनिधी**

भाजपचे स्टार प्रचारक व पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महाराष्ट्रातील विदर्भातून लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात करणार आहेत. १० एप्रिलला त्यांची रामटेक लोकसभा मतदारसंघातील कन्हानमध्ये जाहीर सभा आयोजित करण्यात आल्याची माहिती स्थानिक भाजप नेत्यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात म्हणजे १९ एप्रिलला पूर्व विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. त्यात नागपूर, गडचिरोली, भंडार-गोंदिया, रामटेक व चंद्रपूर मतदारसंघाचा समावेश आहे. यापैकी रामटेकमध्ये शिंदे गटाचा तर चंद्रपूरमध्ये काँग्रेसचे खासदार होते. उर्वरित तीन ठिकाणी भाजपचे विद्यमान खासदार आहेत. पूर्व विदर्भ भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. 'मिशन-४५' अभियानानुसार भाजपने या सर्व जागांवर लक्ष केंद्रित केले आहे.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची ६ एप्रिलला गोंदिया येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.



**पनवेल : प्लास्टिक रिसायकलिंग वॉरियर्स स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या द्रोणागिरी नोड येथील श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर विद्यालयाने प्रथम क्रमांक मिळवला. त्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत, मुख्याध्यापिका अनुराधा काठे, इन्चार्ज टीचर निकिता पाटील यांचे अभिनंदन केले.** (वृत्त पान ३ वर..)

# उद्धव ठाकरे, राहुल गांधींना मतदारच नाकारतील

## केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचा घणाघात

**मुंबई : प्रतिनिधी**

भ्रष्ट नेत्यांच्या अटकेविरोधात एकत्र येत दुखवटा साजरा करण्यासाठी रामलीला मैदानावर जमणाऱ्या सर्व भ्रष्ट नेत्यांना त्यांच्या पराभवाची गॅरंटी असल्यानेच त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असभ्य भाषेत टीका केली. अशा लायकी नसलेल्यांना मतदारच निवडणुकीत तडीपार करतील अशा शब्दांत केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी उद्धव ठाकरे, राहुल गांधी, संजय राऊत यांच्यावर मंगळवारी (दि.२)घणाघात केला.



भारतीय जनता पक्षाच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ना. राणे बोलत होते. भाजप महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान या वेळी उपस्थित होते. राजकीय उंची आणि बौद्धिक कुवत नसलेल्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर पातळी सोडून टीका करणे थांबवावे अन्यथा भाजप कार्यकर्त्यांना त्यांची लीला दाखवावी लागेल असा इशाराही ना. राणे यांनी विरोधकांना दिला.

ना.राणे म्हणाले की, अब की बार भाजपा तडीपार म्हणणाऱ्यांनी स्वत:ची लायकी तपासून पहावी. कोरोना काळात गरीबांच्या टाळूवरचे लोणी खाणाऱ्यांना सूज्ञ मतदारच या वेळी घरी बसवतील. मोदी सरकारवर मॅच फिक्सिंगचा आरोप करणारे उद्धव ठाकरे यांच्यासह सर्व विरोधक, भ्रष्ट नेत्यांच्या समर्थनासाठी एकत्र येतात ही संतापजनक बाब आहे. तपास यंत्रणांच्या धाडीदरम्यान अव्वाच्या सव्वा रोकड मिळत असताना, अनेक घोटाळे समोर येत असताना भ्रष्ट मंत्र्यांवर होणाऱ्या कायदेशीर कारवाई विरोधात ही मंडळी गळे काढत आहेत. लोकशाही तत्त्वांनुसार कायद्याचे पालन करीत सर्व भ्रष्ट नेत्यांवर कारवाई होत असून गरीब सर्वसामान्य जनतेला त्यांच्या हक्काचा पैसा पंतप्रधान मोदी मिळवून देतील असा विश्वास ना.राणे यांनी व्यक्त केला. पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळातील देशाची होणारी प्रगती विरोधकांना सहन होत नसल्यानेच जळफळाटातून पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपवर बिनबुडाची टीका होत आहे, असेही ते म्हणाले.

ना.राणे यांनी देशाच्या प्रगतीचे द्योतक असलेली अर्थव्यवस्थेशी संबंधित आकडेवारीच पत्रकार परिषदेत सादर केली. पंतप्रधान मोदीजींच्या समर्थ नेतृत्वाखाली देशाच्या विकासाची तुफान वेगाने घोडदौड सुरू असून यंदा अब की बार, ४०० पारचे उद्दीष्ट एनडीए नक्की साध्य करेल, असा दावा ना.राणे यांनी केला.

# 'राज्यातील सर्वच्या सर्व ४८ जागा जिंकण्याचा निर्धार'

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस यांची महायुती लोकसभेच्या सर्वच्या सर्व ४८ जागा जिंकण्याच्या निर्धाराने मैदानात उतरली आहे. भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते सर्व जागा जिंकून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विजयाची महाभेट देतील, असा दावा भाजपचे प्रदेश निवडणूक प्रभारी व उत्तर प्रदेशचे माजी उपमुख्यमंत्री खासदार डॉ. दिनेश शर्मा यांनी मंगळवारी (दि.२) व्यक्त केला. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत खासदार शर्मा बोलत होते.



भाजप लोकसभा निवडणूक व्यापस्थापन समितीचे अध्यक्ष आमदार श्रीकांत भारतीय, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ते अतुल शाह, ज्येष्ठ नेते जयप्रकाश ठाकूर, प्रवीण घुगे आदी या वेळी उपस्थित होते.

खासदार शर्मा यांनी सांगितले की, या वेळची निवडणूक मोदीमय झालेली आहे. देशातच नव्हे तर जगभरातही नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाचा बोलबाला आहे. राममंदिर निर्मिती, ३७० कलम रद्द करणे यासारख्या निर्णयांमुळे नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व झळाळून उठले आहे. केंद्र सरकार आणि भाजपशासित राज्यांच्या सुशासनामुळे जनतेचा भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीवरील विश्वास वाढला आहे.

ते म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांनी काँग्रेसला नेहमीच प्रखर विरोध केला. हिंदुत्वाचे कडवे समर्थक असलेल्या बाळासाहेबांना काँग्रेसचे हिंदूविरोधी रूप माहित होते. उद्धव ठाकरे यांनी मात्र मुख्यमंत्रीपद मिळवण्यासाठी राममंदिराला विरोध करणाऱ्या काँग्रेसशी हातमिळवणी करीत मतदारांचा विश्वासघात केला. या विश्वासघाताला मतदार या निवडणुकीत योग्य उत्तर देतील.

# मतदार राजा जागा हो... नवी मुंबईत जनजागृती पंधरवडा उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

शिरवणे व वाशी गटातील शाळांमध्ये नुकताच मतदार राजा जागा हो हा जनजागृती पंधरवडा मोठ्या उत्साहात झाला. केंद्रप्रमुख सागरनाथ भंडारी व केंद्र प्रमुख प्रशांत म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या जनजागृती अभियानात इ. पाचवी ते आठवीच्या सुमारे तीन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



या वेळी शिक्षिका रंजना साळी यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा क्र.१५ शिरवणे या शाळेतही शाळा स्तरावर मतदार राजा जागा हो या विषयावर जनजागृतीपर रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, मतदार फेरी, विद्यार्थ्यांचे पालकांस पत्र आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अमृत पाटील नेरुळकर लिखित मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो या पथनाट्याचे चौकाचौकात प्रयोग सादर करून प्रबोधन केले.

या उपक्रमाविषयी माहिती देताना केंद्र प्रमुख सागरनाथ भंडारी म्हणाले की, शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सातत्याने उपक्रमांचे आयोजन करीत असतो. मतदार जनजागृती पंधरवडा अभियान हा या उपक्रमांचाच एक भाग होता. या अभियानासही विद्यार्थी, शिक्षक, पालकांबरोबरच येथील नागरिकांनीही उत्तम प्रतिसाद दिला. हे या उपक्रमाचे फार मोठे फलित आहे.

# नवी मुंबईत 'ऑटिझम'बाबत जनजागृती

**नवी मुंबई : बातमीदार**

विश्व ऑटिझम जागरूकता दिन टीम सीआरसी तसेच चाईल्ड रिऍक्ट फाउंडेशनच्या वतीने साजरा झाला. या कार्यक्रमात, संघटनेच्या सदस्यांनी नवी मुंबई, मुंबई, नाशिक व नागपूर शहरातील विविध ट्राफिक सिग्नल्सवर उपस्थित असलेल्या नागरिकांना तसेच वाहन चालकांना ऑटिझम आणि त्याची लक्षणे त्याबद्दल जनजागृती वाढविण्यासाठी पोस्टर दाखवले. चार शहरातील तब्बल २५ सिग्नल्सवर हा उपक्रम ७० थेरपीस्ट्सच्या माध्यमातून राबवण्यात आला.




ऑटिझम हा एक संवेदनशील विकार आहे, त्याची लक्षणे लोकांना समजण्याची गरज आहे ज्यामुळे टीम सीआरसीने या संदेशाच्या प्रसारासाठी हा अनौपचारिक मार्ग घेतला. या प्रयत्नातून, ऑटिझमसंबंधित माहिती पोस्टर्स तसेच विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून पोहचविण्याचा प्रयत्न केला गेला आहे. जवळपास सात-आठ हजार लोकांचे लक्ष वेधून त्यांना ऑटिझम काय आहे, त्याची लक्षणे काय असतात त्याबद्धल संदेश पोहचवला. या कार्यक्रमाच्या उत्तम यशासाठी सर्वांनी आपले योगदान दिले, त्यादरम्यान भारतात ऑटिझमचे प्रमाण वाढत आहे, सर्वसामान्य लोकांना अजूनही स्वमग्नता म्हणजे काय, त्याची लक्षणे काय, त्याची परिणाम काय असताता याची कल्पना नाही, बऱ्याच पालकांमध्ये आपले मूल स्वमग्न आहे हे मान्य नसते आणि त्यामुळे त्यावर उपचार योग्य वेळी न केल्याने त्याचे परिणाम गंभीर होऊ शकतात, असे मत डॉ. सुमित शिंदे यांनी मांडले.

१५ वर्षांपासून सीआरसीच्या माध्यमातून दरवर्षी विविध कार्यकतामच्या माध्यमातून ऑटिझम जनजागृती केली जाते.

# तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांना मिळाली नवी वाहने

**पनवेल : वार्ताहर**

शासनाच्या वतीने राज्यभरात महसूल विभागातील अधिकाऱ्यांना नव्या वाहनांचे वितरण करण्यात आले आहे. यामध्ये पनवेल तालुक्यात तहसीलदार आणि प्रांताधिकाऱ्यांनादेखील नवी वाहने देण्यात आली आहेत.


सध्या सुरू असलेल्या निवडणुकांच्या बैठका आदींसह सरकारी दौरे, अलिबाग येथे जिल्हाधिकारी कार्यालय, मंत्रालय आदींसाठी मोठ्या प्रमाणात या अधिकाऱ्यांना खेटे मारावे लागतात. अद्याप रजिस्ट्रेशन बाकी जिल्हा नियोजन समिती निधीतून वाहन खरेदीसाठी राज्य सरकारने परवानगी दिल्यानंतर रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील अनेक तहसीलदार, प्रांतअधिकारी, उपजिल्हाधिकाऱ्यांसाठी वाहन खरेदी केली. यामध्ये पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांना महिंद्रा कंपनीची बोलेरो आणि प्रांतअधिकारी राहुल मुंडके यांना स्कॉर्पिओ देण्यात आली आहे.

# मालवाहतुकीत मध्य रेल्वेची प्रभावी कामगिरी

## २०२३-२४साठी सर्वोत्तम ८९.२४ दशलक्ष टन मालवाहतूक

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने २०२३-२४ या आर्थिक वर्षात मालवाहतूक लोडिंगमध्ये प्रभावी कामगिरी दाखवली आहे. मध्य रेल्वेने आर्थिक वर्ष २०२३-२४साठी ८९.२४ दशलक्ष टन इतके मालवाहतूक लोडिंग केली असून मागील वर्षाच्या ८१.८८ दशलक्ष टन मालवाहतूकीच्या तुलनेत नऊ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे.



मार्च-२०२४ मध्ये ९.०४ दशलक्ष टन मालवाहतूक केली, तर मार्च-२०२३ मध्ये ८.६९ दशलक्ष टन मालवाहतूक करण्यात आली होती. ४.०२ टक्केच्या वाढीसह हा मार्च महिन्यातील आतापर्यंतचा सर्वोत्तम मालवाहतूकीचा आकडा आहे.

मध्य रेल्वेने २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी ८९.०५ दशलक्ष टन मालवाहतूकीचे लक्ष्य ही ओलांडले आहे. उल्लेखनीय मालवाहतूक कामगिरीमधून मध्य रेल्वेला ९४४६ कोटी रुपयांचा मूळ मालवाहतूक महसूल मिळवता आला असून मागील वर्षाच्या तुलनेत यात १२ टक्के वाढ झाली आहे आणि मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल १००७ कोटी रुपयांची वाढ झाली आहे. विकासाच्या बाबतीत, ७५ दशलक्ष टनांहून अधिक मालवाहतुक कामगिरीत मध्य रेल्वे तिसऱ्या क्रमांकावर आहे.

मध्य रेल्वेने मार्च-२०२४ मध्ये लोडिंगमध्ये वाढ झाली यामध्ये गेल्या वर्षीच्या १५१४ रेकच्या तुलनेत १९२७ स्टीलचे रेक (२७.३ टक्केची वाढ), गेल्या वर्षी १०२० रेकच्या तुलनेत ऑटोमोबाईल्सचे ११७८ रेक (१५.५ टक्केची वाढ), मध्य रेल्वेच्या अथक परिश्रमातून, सर्व मालवाहतूक कामगिरीमध्ये सातत्यपूर्ण सुधारणा राखण्यात यशस्वी झाली आहे, आणि यामुळे मालवाहतुकीच्या कामगिरीत लक्षणीय वाढ साध्य करू शकली आहे.

# 'सीकेटी'ची ऋतुजा काव्य लेखनात ठरली अव्वल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक जलदिनाचे औचित्य साधून सामाजिक सेवा संस्था पनवेल आणि रोटरी क्लब ऑल पनवेल सनराईज या दोन संस्थेच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये जलसाक्षरता जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने मराठी काव्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागातून इ.नववीची ऋतुजा नरेंद्र म्हात्रे हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. प्रशस्तीप्रत्रक, रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन तिला गौरविण्यात आले.




ऋतुजाचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पान १ वरुन

# लोकसभा निवडणुकीसाठी भाजपचे बूथ विजय अभियान

घरोघरी पत्रके पोहचवून मतदारांशी थेट संपर्क साधणे, प्रत्येक घर, वाहनावर स्टिकर्स लावणे, लाभार्थींशी नियमित संपर्कात राहणे, प्रत्येक कार्यकर्त्याच्या घरी भाजपचा झेंडा लावणे आदी उपक्रम राबवले जातील. युवा वर्ग, महिला अशासमाजातील विविध घटकांसाठी पाच समूह बैठकाही घेण्यात येतील, अशी माहितीही पाठक यांनी दिली. भाजपा शी संबंधीत नसलेल्या मतदारांपर्यंत मोदी सरकारचे कार्य व योजना पोहचवून भाजपला मत देण्यासाठी त्यांचे मन वळवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

बूथपासून दूर रहाणाऱ्या मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करण्यात येईल तसेच जिथे महायुतीचा उमेदवार असेल तिथे पक्षाची मते महायुती उमेदवारालाच जातील याकडे विशेष लक्ष देण्यात येणार असल्याचे पाठक यांनी सांगितले.

# आत्मनिर्भर भारतासाठी बहुआयामी शैक्षणिक धोरण महत्त्वाचे -कुलगुरू डॉ.कारभारी काळे

**रायगड : प्रतिनिधी**

आत्मनिर्भर भारत आणि विकसित भारत २०४७करिता बहुआयामी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०महत्वाची भूमिका बजावेल, असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेचे कुलगुरू प्रा.डॉ.कारभारी काळे यांनी मंगळवारी (दि.२) येथे केले.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठामार्फत १२वी नंतर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांसाठी एक दिवसीय स्कूल कनेक्ट कार्यशाळेत ते बोलत होते.

या कार्यशाळेस परिसरातील एकूण २००पेक्षा अधिक विद्यार्थी व पालकांनी सहभाग नोंदविला. ही कार्यशाळा दोन सत्रात आयोजित करण्यात आली असून पहिल्या सत्रात राज्यात राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मधील शैक्षणिक बदलांबाबत जागृती, बँकेच्या शैक्षणिक कर्ज योजना, विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध शिष्यवृत्ती योजना, विद्यापीठात उपलब्ध शैक्षणिक सोईसुविधा, विद्यापीठामार्फत राबविण्यात येणारे विविध उपक्रम, रोजगार, इंटर्नशिप करिता विद्यापीठामार्फत सहाय्य इ. बाबत मार्गदर्शन करण्यात आले तर दुसऱ्या सत्रात विद्यापीठातील विविध विभागांना भेट आयोजित करण्यात आली.

या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू प्रा.डॉ.कारभारी काळे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अरविंद किवळेकर, डॉ.एच.एस. जोशी, डॉ.ए.पी. शेष, डॉ.नीरज अग्रवाल, डॉ.एस.एम.पोरे आणि पदविका विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरेचे प्राचार्य डॉ. मधुकर दाभाडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या कार्यशाळेत डॉ.ए.पी. शेष इंग्लिश विभागप्रमुख यांनी विद्यार्थी व त्यांच्या पालकांशी संवाद साधतांना समग्र शिक्षण, जीवनावश्यक कौशल्य व माणुसकी याचे आपल्या शैक्षणिक जीवनातील महत्त्व विषद केले. करिअर डेव्हलपमेंट सेंटरचे प्रमुख डॉ. नीरज अग्रवाल यांनी विद्यापीठात विद्यापीठामार्फत राबविण्यात येणारे विविध उपक्रम, रोजगार, इंटर्नशिप, स्टार्टअप/उद्योजकता करिता विद्यापीठामार्फत सहाय्य इ.बाबत मार्गदर्शन तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महत्त्वाची भूमिका पार पेल असे मत व्यक्त केले. प्राचार्य डॉ.मधुकर दाभाडे यांनी विद्यार्थी व त्यांच्या पालकांशी संवाद साधतांना आपल्या भागातील संभाव्य उद्योग संधी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी उद्योग स्थापन करावे तसेच आपल्या परिसरात उत्तम दर्जाचे अभियंता निर्माण होतील या करिता विद्यापीठ सदैव आपल्या पाठीशी आहे अशी ग्वाही दिली. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अरविंद किवळेकर यांनी विद्यापीठामार्फत उत्तम विद्यार्थी घडविण्याच्या दृष्टीने विद्यापीठामार्फत सुरु करण्यात आलेल्या विविध नवीन उपक्रमाबद्दल माहिती दिली.

# मुंबईत ५४ लाखांच्या हेरॉइनसह एकाला अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

माहिमच्या रहेजा उड्डाणपुलावर हेरॉइन विकण्यासाठी आलेल्या २६ वर्षीय तरुणाला शाहूनगर पोलिसांनी अटक केली. आरोपीकडून ५४ लाख रुपये किमतीचे हेरॉईन जप्त करण्यात आले आहे.

सरफराज अब्दुल माजिद अहमद असे आरोपीचे नाव असून तो मूळचा उत्तराखंड येथील रहिवासी आहे. आरोपी सध्या वसई-नायगाव येथे वास्तव्यास होता. शाहूनगर पोलिसांचे पथक रविवारी रात्रीच्या वेळेस गस्त घालत असताना शीव-माहीम जोड मार्गावरील रहेजा उड्डाणपुलावर एक तरुण संशयास्पद हालचाली करताना पथकाच्या नजरेस पडला.

पोलिसांनी त्याला रोखले आणि झडती घेतली असता त्याच्याकडे २७० ग्रॅम हेरॉईन सापडले. याशिवाय सरफराज अहमद नावाचे आधार व पॅनकार्ड, एक मोबाइल व पाच हजार रुपये रोख असा मुद्देमाल आढळला. त्याने हा साठा कोठून आणला होता, तसेच ते तो कोणाला विकणार होता याचा पोलीस शोध घेत आहेत.

# 'आयसर'च्या प्रवेश परीक्षेची तारीख जाहीर

**पुणे : प्रतिनिधी**

देशभरातील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेतील (आयसर) विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची 'आयसर ॲप्टिट्यूट टेस्ट' (आयएटी) ९ जूनला घेण्यात आहे. या प्रवेश परीक्षेसाठीची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, ऑनलाइन अर्जांसाठीची अंतिम मुदत १३ मे आहे.

अभ्यासक्रमांच्या प्रवेशांसाठी विद्यार्थी बारावी उत्तीर्ण, बारावीला जीवशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, भौतिकशास्त्र यापैकी तीन विषय असणे आवश्यक आहे. अधिक माहिती http://www.iiseradmission.in/ या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

# महिलेची हत्या करून आरोपीचे पलायन

## आरोपीला अटक; प्रेमसंबंधातून कृत्य केल्याचे उघड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील भिंगारी गावातील निर्जनस्थळी सहा महिन्यांपूर्वी महिलेचा गळा दाबून हत्या करून पळून गेलेल्या आरोपीला मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा नवी मुंबई यांनी अटक केली आहे. पांडव गोरख जाधव उर्फ पांड्या (वय २१,रा. मालधक्का झोपडपट्टी पनवेल) असे आरोपीचे नाव आहे. प्रेमसंबंधातून हत्या केल्याचे तपासात उघड झाले आहे.

भिंगारी गावच्या निर्जनस्थळी १० ऑक्टोबर २०२३ला एका महिलेची हत्या झाल्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा समांतर तपास पोलीस आयुक्त मिलींद भारंबे, सहायुक्त संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त गुन्हे दीपक साकोरे, पोलीस उपायुक्त गुन्हे अमित काळे, सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्ष गुन्हेशाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक



सुनील शिंदे, सपोनि. हर्षल कदम, दशरथ विटकर, शशिकांत पवार, श्रीनिवास तुंगेनवार, घेगडमल, अलका पाटील, फौजदार मंगेश वाट, हवालदार उर्मिला बोराडे, नितीन जगताप, शशिकांत शेंडगे, अनिल यादव, महेश पाटील, पोलीस नाईक महेश अहिरे, सचिन टिके, अजय कदम, निलेश किंद्रे, सतीश चव्हाण, शिपाई अशोक पाईकराव, नितीन परोडवाड यांच्या पथकाने सुरू केला. तांत्रिक तपास, मृत महिलेच्या संपर्कात असणाऱ्या व्यक्ती व परिसरातील व्यक्तींकडील माहितीच्या आधारे आरोपीचा तपास सुरू केला. गुप्त बातमीदारांनी मृत महिलेसोबत राहणारा अनोळखी व्यक्तीबाबत माहिती प्राप्त केली.

आरोपी शुक्रवारी (दि.२९) ओरियन मॉल पनवेल येथे असल्याबाबतची माहिती हवालदार महेश पाटील यांना मिळाल्याने मध्यवर्ती कक्षाचे वपोनि सुनील शिंदे यांनी तत्काळ अलका पाटील, सहाय्यक फौजदार मंगेश वाट, हवालदार बोराडे यांचे पथक पाठवून पांडव गोरख जाधव उर्फ पांड्या याला शिताफिने ताब्यात घेतले. त्याचेकडे कौशल्यपूर्ण चौकशी करून तो गुन्हा घडल्यापासून स्वतःची ओळख बदलून महाराष्ट्रात व गुजरात राज्यातील सुरत येथे राहत असल्याचे सांगून गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीला पुढील तपासकामी पनवेल शहर पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले.

अटक आरोपी व मृत महिलेचे प्रेमसंबंध असून घटनेच्या दिवशी आरोपी व मयत महिला यांनी दारू पिऊन आपसात झालेल्या भांडणातून आरोपीने मृत महिलेचा गळा दाबून हत्या केली असल्याचे तपासात निष्पन्न झाले.







**पनवेल : भाजप मध्यवर्ती कार्यालय, कळंबोली भाजप जनसंपर्क कार्यालय आणि कामोठे भाजप जनसंपर्क कार्यालय येथे अनुसूचित जाती मोर्चा, ग्रामीण आणि शहर मंडलची येणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात चर्चा, विचार-विनिमय करण्यासाठी सोमवारी बैठकींचे आयोजन करण्यात आले होते. या तिन्ही बैठकीस ग्रामीण, शहर आणि जिल्हा मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते. त्या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, अनुसूचित जाती मोर्चा, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव यांनी मार्गदर्शन केले.**

# प्लास्टिक रिसायकलिंग वॉरियर्स स्पर्धेत बीसीटी विद्यालय प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इंडियन सेंटर फॉर प्लास्टिक इन द एन्वार्मेन्ट यांच्यामार्फत प्लास्टिक रिसायकलिंग वॉरियर्स स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत द्रोणागिरी येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला. त्यानिमित्ताने सोमवारी (दि.१) या स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे, इनचार्ज शिक्षक निकिता आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

यामध्ये एकूण १५७ किलो प्लास्टिक कचरा जमा करून शाळेने एक उच्चांक प्रस्थापित केला आणि या स्पर्धेमध्ये



प्रथम क्रमांक मिळवला. त्याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत, मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांचा मंगळवारी सत्कार केला. ही स्पर्धा इंडियन ऑईल, एसपीएलओपीएल, गेल इंडिया लिमिटेड, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांच्यातर्फे रायगड जिल्हा आणि नवी मुंबईतील शाळांसाठी प्रायोजित करण्यात आली होती.

## बाकी राहिलेले पैसे मागणाऱ्याला दमदाटी, शिवीगाळ

**पनवेल : वार्ताहर**

विकलेल्या स्कुटी गाडीचे बाकी राहिलेले पैसे मागण्यासाठी फोन केला असता या गोष्टीचा राग मनात धरून पैसे मागणाऱ्यालाच फोनवर शिवीगाळ व दमदाटी केल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

श्रीकृष्णा सुरळकर यांनी त्यांची स्कुटी अशपाक शेख यांना विकली होती. या गाडीचे बाकी राहिलेले पैसे मागण्यासाठी फोन केला असता, या गोष्टीचा राग मनात धरून पैसे मागणाऱ्यालाच फोनवर शिवीगाळ व दमदाटी केल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सेंट फ्रॅन्सिस झेवियर चर्चमध्ये चोरी

**पनवेल : वार्ताहर**

शहरातील ओरियन मॉलच्या मागे असलेल्या सेंट फ्रॅन्सिस झेवियर चर्चमध्ये चोरी झाल्याची घटना घडली आहे. येथील चर्चमध्ये अज्ञात चोरट्याने चर्चच्या पाठीमागील दरवाजा उचकटून आत प्रवेश करून तेथील पाच दान पेट्या तोडून त्यामधील अंदाजे ५० हजार रुपये रोख रक्कम चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## सीकेटी मराठी प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांचे चित्रकला स्पर्धेत सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर मराठी विद्यालयात कॅमल आर्ट कॉन्टेस्ट २०२३तर्फे चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विद्यालयाच्या ७३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. इ. पहिली-दुसरीच्या गटातून प्रथम अन्वी गणेश पाटील व इ. तिसरी-चौथी या गटातून प्रथम नुपूर निलेंद्र गावडे या विद्यार्थ्यांनी प्राविण्य प्राप्त केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ.एस.टी.गडदे तसेच मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाला राजिप शाळेतील विद्यार्थी, पालकांनी दिली भेट

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाला राजिप शाळा उलवे येथील विद्यार्थ्यांची नवीन प्रवेश घेण्याच्या दृष्टीने भेट दिली.

उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयाची सुसज्ज इमारत, इमारतीमधील आधुनिक भौतिक सुविधा, विद्यार्थ्यांसाठी वापरण्यात येणारे डिजिटल क्लासरूम, एलसीडी प्रोजेक्टर, नावीन्यपूर्ण अध्ययन अध्यापन प्रक्रिया, विद्यालयातील गुरुकुल प्रकल्प तसेच विद्यालयातील शिक्षक राबवत असणारे विविध नावीन्यपूर्ण अभ्यासपुरक, पर्यावरणपुरक उपक्रम यांची माहिती मिळविण्यासाठी राजिप शाळा उलवे यांनी विद्यालयाला भेट दिली. या वेळी विद्यार्थ्यांसोबत त्यांचे पालक, मुख्याध्यापक व शिक्षिका उपस्थित होते.

आलेल्या विद्यार्थ्यांना, पालकांना विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. जी. हजारे यांनी विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यालय उभारणी पासून विद्यालयाच्या शैक्षणिक सुविधांसाठी दिलेल्या कोट्यावधी रुपयांच्या निधीची माहिती देऊन विद्यालयाचे स्पर्धा परीक्षेतील यश, विविध पुरस्कार यांची माहिती दिली. त्यानंतर व्ही. व्ही. गावंड यांनी सर्वांना विद्यालयातील भौतिक सुविधा, संगणक कक्ष, सुसज्ज प्रयोगशाळा, भव्य मैदान दाखवून उपस्थितांचे आभार मानले.



## पनवेल शहर पोलिसांकडून बूथनिहाय मतदान केंद्राची पाहणी



**पनवेल : वार्ताहर**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या चार दिवसांपासून पनवेल शहर पोलिसांनी हद्दीतील एकूण बूथनिहाय मतदान केंद्रांची पाहणी करून त्यांचा आढावा घेतला आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अंजुम बागवान, पोलीस निरीक्षक (प्रशासकीय) प्रवीण भगत, गोपनीय विभागाचे अधिकारी संजय धारेराव आदींच्या पथकाने विधानसभा १८८ मतदारसंघातील २१ केंद्रे व ७८ मतदान बूथ त्याचप्रमाणे विधानसभा १९० येथील १९ केंद्रे व ४७ मतदान बूथ असे एकूण लोकसभा मावळ ३३ची ४० केंद्रे व १२५ मतदान बूथ यांची पाहणी गेल्या चार दिवसांपासून करण्यात आली आहे.

त्या दृष्टीने तेथील सुरक्षितता त्या गाव परिसरातील लोकवस्ती त्यातील गुन्हेगार आदी बाबींचा आढावा या पाहणी दौऱ्यात घेण्यात आला आहे.

# जेएनपीएचे टोटल ट्राफिक पोहचले ८५.८२ दशलक्ष मेट्रिक टनांवर

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जेएनपीएने २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६.४३ दशलक्ष टिईयूएसची आतापर्यंतची सर्वाधिक थ्रूपुट (प्रक्रियेचे माप) नोंदवून ऐतिहासिक टप्पा गाठला. २०२२-२३चा ६.०५ दशलक्ष टीईयू अंक ओलांडून, बंदराने आपला यशस्वी प्रवास सुरू ठेवला आहे. त्या तुलनेत, मागील वर्षीच्या याच कालावधीत एकूण थ्रूपुटमध्ये लक्षणीय ६.२७ टक्के वाढ नोंदवून विक्रमी थ्रूपुट नोंदविला आहे.

एप्रिल-२०२३ ते मार्च-२०२४ या कालावधीत जनेपप्रा येथे हाताळलेली टोटल ट्राफिक ८५.८२ आहे दशलक्ष टन, जे मागील आर्थिक वर्षातील ८३.८६ दशलक्ष टनांच्या तुलनेत २.३३ टक्क्यांनी अधिक आहे.

यामध्ये ७८.१३ दशलक्ष टन कंटेनर ट्राफिक आणि ७.७० दशलक्ष टन बल्क कार्गोचा समावेश आहे, जे मागील वर्षीच्या याच कालावधीत अनुक्रमे ७६.१९ दशलक्ष टन कंटेनर ट्राफिक आणि ७.६७ दशलक्ष टन बल्क ट्राफिक होते. कंटेनर ट्राफिकचे ब्रेकडाउन दर्शवते की, इचउढ येथे २.०३ दशलक्ष २०२७७८१ टिईयूएस, एपीएमटी येथे १.५९ दशलक्ष टीईयूएस, एनएसआयसीटी येथे १.१३ दशलक्ष टीईयूएस, एनएसआयजीटी येथे १.११ दशलक्ष टीईयूएस, एनएसएफटी येथे ०.५६ दशलक्ष टीईयूएस आणि एनएसडीटी येथे ७,९७८ टीई यूएस कंटेनर हाताळण्याचा विक्रम केला.




जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, आम्हाला हा महत्त्वाचा क्षण जाहीर करताना खूप अभिमान वाटत आहे. हे बंदर एक्झिम व्यापारासाठी प्रमुख प्रवेशद्वार म्हणून स्थापित करण्याच्या आमच्या समर्पणाला अधोरेखित करते.

हे यश सेंट्रलाईज पार्किंग प्लाझा, सिंगल विंडो क्लीयरन्स आणि इतर विविध उपक्रमांसह उच्च दर्जाच्या सेवा देण्याच्या आमच्या कार्यसंघाच्या अतूट वचनबद्धतेला प्रतिबिंबित करते, ज्यामुळे व्यवसाय अधिक सुलभ होतो. मी आमच्या सर्व भागीदारांचे आणि भागधारकांचे त्यांच्या निरंतर विश्वास आणि समर्थनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो.

जनेपप्रा देशाच्या आर्थिक प्रगतीत योगदान देण्याच्या आपल्या ध्येयासाठी कायम प्रयत्नशील आहे. हा ऐतिहासिक टप्पा आज सर्व जनेपप्रा टर्मिनल ऑपरेटर आणि व्यापारी संघटनांच्या उपस्थितीत केक कापून साजरा करण्यात आला.

## रेल्वे रूळावर आढळला महिलेचा मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील काळुंद्रे गावाजवळ रेल्वेरूळ पोल क्र. ६९/२७ येथे एका अनोळखी महिलेचा आढळून आला असून तिच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

या मृत महिलेचे वय अंदाजे ६० ते ६५ वर्षे असून रंग सावळा, उंची अंदाजे साडेपाच फुट, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, डोक्याचे केस काळे-पांढरे व वाढलेले, कपाळ रुंद, नाक दबलेले चपटे, डाव्या हातात काचेच्या दोन हिरव्या बांगड्या, अंगात मोरपंखी रंगाची साडी व लाल रंगाचे ब्लाऊज घातलेले आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे (९८२३०४७१६१) यांच्याशी संपर्क साधावा.

## संपादकीय

# ‘आम आदमी’चा कांगावा

आपचे खासदार संजय सिंह यांची सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी जामिनावर सुटका केली असली तरी या प्रकरणाबद्दल राजकीय वक्तव्ये किंवा शेरेबाजी करू नये अशी सूचना त्यांना देण्यात आली आहे. संजय सिंह यांच्या जामिनाला ईडीच्या वकिलांनी अजिबात विरोध केला नाही. तपासयंत्रणा त्यांच्या पद्धतीने कायद्याच्या चौकटीत राहून काम करत असतात. राजकारणात काय चालले आहे त्याच्याशी त्यांना काहीच देणेघेणे नसते. तरीही ईडी आणि भाजपच्या विरोधात ‘आप’चा कांगावा सुरूच आहे. निवडणूक आटोपेपर्यंत तो काही थांबणार नाही.

**अपघात करून पळून जाणाऱ्या वाहनचालकांवर सीसीटीव्हीच्या माध्यमातून नजर ठेवून कारवाई करता येते, परंतु भारतीय राजकारणात स्पिट अँड रन म्हणजेच थुंकी उडवा आणि पळा अशा प्रकारचा नवा पायंडा पडू लागला आहे. वाट्टेल तसे बेफाम आरोप करून पुरावे देण्याच्या भानगडीत न पडता सटकून जायचे या खेळामध्ये आता जवळपास सगळेच राजकीय पक्ष तयार झाले आहेत, परंतु त्यातही पहिला क्रमांक आम आदमी पक्षाचाच लावावा लागेल. बेफाम आरोप करून स्वत:ची पोळी भाजून घ्यायची ही खोड ‘आप’च्या नेत्यांना सुरूवातीपासूनच लागली आहे. आपला पक्ष धुतल्या तांदळासारखा स्वच्छ असून बाकीचे सारेच पक्ष भ्रष्टाचाराने बरबटलेले आहेत असा डंका आम आदमी पक्षाने कायम पिटला, परंतु त्यांचा ढोंगीपणा दिवसेंदिवस उघडा पडत चालला आहे. गेल्या वर्षी राजधानी दिल्लीमधील कथित मद्य घोटाळा चव्हाट्यावर आला. मद्यविक्रेत्यांचे उखळ पांढरे व्हावे म्हणून दिल्लीतील केजरीवाल सरकारने नवे मद्य धोरण अंमलात आणले. यातील प्रचंड घोटाळा बाहेर कोणी काढला? तर तो काँग्रेसने काढला. भारतीय जनता पक्षाचा यामध्ये कुठल्याही प्रकारचा हात नव्हता. काँग्रेस कार्यकर्त्यांनी केलेल्या तक्रारीच्या जोरावर तपास यंत्रणांची चक्रे फिरली आणि केजरीवाल सरकारमधील मंत्री आणि पदाधिकारी गजाआड गेले. काही दिवसांपूर्वी खुद्द मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर अटकेची कुऱ्हाड कोसळली. केजरीवाल यांना अटक होणे अटळ होते कारण साक्षीदारांनी त्यांचेच नाव जबानीमध्ये घेतले आहे. तरीही सक्तवसुली संचलनालयाच्या (ईडी) नऊ समन्सना केराच्या टोपलीत टाकण्याचे अनाठायी धाडस केजरीवाल यांनी केले. ईडीच्या चौकशीला ते चार महिन्यांपूर्वीच सामोरे गेले असते तर एव्हाना सारे काही सुरळीत होऊन ते निवडणूक प्रचाराला लागले असते, परंतु विनाशकाले विपरित बुद्धी असे म्हणतात त्या प्रमाणे घडले. केजरीवाल यांची रवानगी १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीसाठी तिहार तुरुंगात झाली. त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांचे अटकेत असलेले दुसरे साथीदार संजय सिंह यांची जामिनावर सुटका झाली. ईडीने खोट्या प्रकरणात आपल्याला गोवले असल्याचा आरोप केजरीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला आहे. दुसऱ्यावर चिखलफेक करून आपण शहाजोगपणे दुसरे उद्योग चालू ठेवायचे हा पवित्रा केजरीवाल आणि कंपनीच्या अंगलट आला आहे असे दिसते. मद्य घोटाळ्याबाबत काँग्रेसने ‘आप’ सरकारवर टीकेची झोड उठवली होती. इतकेच नव्हे तर हा घोटाळा बाहेर काढण्याचे श्रेय घेण्यात काँग्रेसी नेत्यांमध्ये शर्यत लागली होती, पण निवडणुकांच्या तोंडावर मात्र तीच काँग्रेस आता केजरीवाल आणि कंपनीला वाचवण्यासाठी धडपडते आहे. एकमेकांची पापे झाकून आपण सहीसलामत सुटू शकू असा जर इंडिया आघाडीच्या नेत्यांचा समज असेल तर तो एक भ्रम आहे हे त्यांनी ओळखून असावे.**

# ...तर खासदार श्रीरंग बारणेंची विजयी हॅट्ट्रिक



## मावळ लोकसभा मतदारसंघात सध्या सहा विधानसभा क्षेत्रांचा समावेश

| जिल्हा (रायगड) | | | | जिल्हा (पुणे) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्रमांक | नाव | सदस्य | पार्टी | क्रमांक | नाव | सदस्य | पार्टी |
| १८८ | पनवेल | प्रशांत ठाकूर | भाजप | २०४ | मावळ | सुनील शेळके | राष्ट्रवादी |
| १८९ | कर्जत | महेंद्र थोरवे | शिवसेना | २०५ | चिंचवड | अश्विनी लक्ष्मण जगताप | भाजप |
| १९० | उरण | महेश बालदी | अपक्ष | २०६ | पिंपरी (एससी) | अण्णा बनसोडे | राष्ट्रवादी |

मावळ मतदारसंघात पुणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांचा समावेश होतो. या मतदारसंघात पुण्यातील मावळ, पिंपरी आणि चिंचवडचा समावेश होतो. तसेच रायगडमधील पनवेल, उरण आणि कर्जत या विधासभा मतदारसंघाचाही समावेश होतो. राज्यात गेल्या वर्षभरात मोठे राजकीय बदल झाले. त्यामुळे येणाऱ्या लोकसभा निवडणुकांचे चित्रही जरा बदलले आहे. यातून मावळही सुटलेले नाही. २००९ पासून या मतदारसंघात शिवसेनेचे वर्चस्व असून शिवसेना पक्षाच्या फुटीनंतर विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी एकनाथ शिंदेंना साथ दिली आहे. त्यामुळे २०१४ पासून खासदार असलेले बारणे आगामी लोकसभा निवडणुकीत विजयाची हॅटट्रिक करणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघ हा पश्चिम भारतातील महाराष्ट्र राज्यातील ४८ लोकसभा (भारतीय संसदेचे कनिष्ठ सभागृह) मतदारसंघांपैकी एक आहे. हा मतदारसंघ १९ फेब्रुवारी २००८ रोजी स्थापन करण्यात आलेल्या भारतीय सीमांकन आयोगाच्या शिफारशींवर आधारित राष्ट्रपती अधिसूचनेच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून तयार करण्यात आला होता. ह्यामध्ये पुणे व रायगड जिल्ह्यांमधील प्रत्येकी ३ विधानसभा मतदारसंघ समाविष्ट केले गेले आहेत. २००९ मध्ये पहिल्यांदा निवडणुका घेतल्या आणि त्याचे पहिले संसद सदस्य (खासदार) शिवसेनेचे गजानन बाबर होते.

### लोकसभा मतदारसंघात एकूण २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार

***विधानसभा मतदार संघ सहा, मतदान केंद्र २५५६ व कर्मचारी १८,००० आहेत. यामध्ये पुरुष १३ लाख १० हजार ४३४ मतदार, महिला ११ लाख ९८ हजार ८६८ मतदार, इतर १५९ असे एकूण २५ लाख नऊ हजार ४६१ मतदार आहेत.***

**खबरबात**
**नितीन देशमुख**

मावळ लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीची तयारी अंतिम टप्प्यात असून, या मतदारसंघात २५५६ मतदान केंद्रांसाठी सुमारे १८ हजार कर्मचारी, अधिकारी नेमण्यात येणार आहेत. नवीन मतदारांचा टक्का वाढविण्यासाठी महाविद्यालये व परिसरात शिबिरे घेऊन मतदानात सहभाग वाढविण्यासाठी मतदान जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात नव मतदारांची संख्या सुमारे २० ते २५ हजारांनी वाढली आहे. सर्वच मतदान केंद्रांवर मंडप, पिण्याचे पाणी आदी सुविधा दिल्या जाणार असल्याची माहिती मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा ‘पीएमआरडीए’चे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला यांनी दिली आहे. लोकसभा २०१९ च्या निवडणुकीवेळी मावळ मध्ये शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी अशी थेट लढत झाली होती. तेव्हा बारणेंनीच विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांना मोठ्या मताधिक्क्याने पराभूत केले होते. त्यानंतर हा मतदार संघ प्रकाश झोतात आला आहे. या वेळी अजित पवार गट आणि शिंदे गट एकत्र असल्याने ही जागा महायुतीकडून एकनाथ शिंदे गटाचे खासदार श्रीरंग बारणे यांनाच मिळाली आहे. तर महाविकास आघाडीकडून उद्धव ठाकरे गटाच्या संजोग वाघेरे यांना मिळाली आहे. त्यानिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्यात थेट सामना पाहायला मिळेल. त्यात कोणाचे पारड जड होईल हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.




पुणे जिल्ह्यातले पिंपरी, चिंचवड, मावळ आणि रायगड जिल्ह्यातले कर्जत, उरण आणि पनवेल असे तीन विधानसभा मिळून तयार झालेला हा मतदारसंघ. भौगोलिक परिस्थितीचा विचार केल्यास हा मतदारसंघ मुंबईच्या लगत आहे हा भाग विविधतेने नटलाय... पिंपरी चिंचवडचा भाग औद्योगिक तर मावळ भात शेतीसाठी प्रसिद्ध आहे. कर्जत, उरण आणि पनवेल हे कोकणाचे प्रतिनिधित्व करणारे विभाग. पिंपरीतले मोरया गोसावी मंदिर राज्यातल्या गणेश भक्तांचे श्रद्धास्थान तर लोणावळ्या जवळची एकवीरा देवी अनेकांचे कुलदैवत. लोकांना आकर्षित करणारी लोणावळा–खंडाळा ही पर्यटनस्थळे, कार्ल्याची प्रसिद्ध लेणी याच मतदारसंघात आहेत. मतदारसंघात ६० टक्के लोकं ग्रामीण भागात राहतात तर उरलेले ४० टक्के निमशहरी आणि शहरी भागात राहतात.

रायगड जिल्ह्यातील कर्जत, पनवेल आणि उरणमध्ये भाजपचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे भाजप मोठ्या प्रमाणात वाढवला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि तत्कालीन पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी कष्टकरी जनता आणि शेतकऱ्याला त्यांच्या साठीच्या विविध योजनांचा लाभ त्यांना मिळवून दिला आहे. पनवेल महापालिका हद्दीतील आणि अनेक गावातील पाण्याच्या योजना, रस्ते आणि वीज या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतली आहे. मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात अजित पवार यांचे वर्चस्व आहे.


लोकसभा मतदारसंघात शेतकरी कामगार पक्षही आहे. शेतकरी कामगार पक्षाचा प्रभाव हा रायगड जिल्ह्यात कर्नाळा बँक घोटाळ्यामुळे कमी झाला आहे. त्याचा फायदा लोकसभा निवडणुकीत युतीच्या उमेदवाराला निश्चितच मिळेल.



## बदलते तंत्रज्ञान

# आत गुगल मॅपसुद्धा वापरणार एआय!

लोकांना त्यांच्या योग्य स्थळी पोहचण्याचा मार्ग दाखविण्याचे काम करणारे गुगल मॅप्स हे त्यांच्या नवनवीन फीचरसाठी, तसेच अपडेट्ससाठीदेखील प्रसिद्ध आहे. वापरकर्त्यांचा ॲप वापरण्याचा अनुभव अधिक सोईचा व्हावा यासाठी गूगल मॅप्स नेहमीच कार्यरत असते. त्यातच या ॲपने वापरकर्त्यांचा उन्हाळी प्रवास सोईचा व्हावा यासाठी मॅप्सच्या डिझाईनमध्ये तीन खास बदल केले आहेत. ते नेमके कोणते आहेत आणि त्यांचा काय उपयोग होईल ते पाहू.



मॅप्स पाहणे सोईचे व्हावे यासाठी नवीन डिझाईनमध्ये होमपेजवर मोजके टॅब्स असून पिनचा रंग बदलण्यात आला आहे. यूएस आणि कॅनडामधील काही ठिकाणांवर गूगल मॅप्सने आता स्थानिक आणि व्यावसायिकांनी निवड केलेल्या रेस्टॉरंट्सची शिफारस केली आहे. तुम्ही तुमच्या इच्छुक स्थळी पोहोचल्यानंतर स्क्रीनवरील गूगल मॅप्समध्ये वर स्वाइप केल्यानंतर विश्वसनीय स्त्रोतांकडून शिफारस केल्या गेलेल्या रेस्टॉरंट्स आणि हॉटेल्सची यादी तुम्ही पाहू शकता.

दर आठवड्याला ही ट्रेंडिंग लिस्ट अपडेट होत राहते. हे अपडेट नकाशावरील जागांची एकंदरीत लोकप्रियता लक्षात घेऊन केले जाते तसेच लोकांना माहीत नसलेल्या ठिकाणांना म्हणजेच हिडन जेम्सनाही या यादीत विशेष स्थान दिले जाते.

गूगल मॅप्स वापरकर्ते त्यांच्या आवडत्या जागांची एक लिस्ट बनवू शकतात. त्यामुळे वापरकर्त्यांना सहलींचे नियोजन करणेही सोईचे होते. त्यासाठी मॅप्समध्ये न्यू लिस्ट या पर्यायावर क्लिक करा आणि तुमच्या आवडत्या जागा त्यामध्ये ॲड करून तुम्ही स्वत:साठी एक लिस्ट बनवू शकता. इतकेच नाही तर वापरकर्ते सोशल मीडियावरील लिंक मॅप्सवर टाकून त्याचा फायदा स्वत:साठी करून घेऊ शकतात तसेच आयएसओ आणि ॲण्ड्रॉईड स्मार्टफोनवर ट्रिप प्लॅनिंग आणि शेअरिंगच्या पर्यायांचा जागतिक अपग्रेड गुगल मॅप्स देणार असल्याचे ट्रॅक डॉट इनच्या माहितीवरून समजते.

गुगल मॅप्स आता प्रतिक्रिया स्कॅन करण्यासाठी फोटो आणि ठिकाणांची वैशिष्ट्ये हायलाईट करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजेच एआयचा वापर करणार आहे. त्याद्वारे वापरकर्त्यांना इच्छुक स्थळी पोहचण्याआधीच त्या जागेबद्दल थोडक्यात माहिती देण्यास मदत केली जाते. एआय फोटोमधील अन्नपदार्थ ओळखण्यास सक्षम असून वापरकर्त्यांना त्याबद्दल उपयुक्त माहिती दिली जाऊ शकते.

# संस्कृत विद्वान, प्राच्यविद्यासंशोधक डॉ.वा.वि.मिराशी



**निमित्त**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय प्राच्यविद्यासंशोधक व भारतविद्यातज्ज्ञ. त्यांचा जन्म १३ मार्च १८९३ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील कुवळे (सध्या जि.सिंधुदुर्ग) येथे मध्यमवर्गीय कुटुंबात विष्णू व राधाबाई या दाम्पत्यापोटी झाला. त्यांचे शिक्षण राजाराम हायस्कूल व राजाराम कॉलेज, कोल्हापूर येथे तसेच पुणे येथील डेक्कन कॉलेजमध्ये झाले. त्यांनी मॅट्रिक, बीए आणि एमए या परीक्षांत प्रथमवर्ग पटकाविला. त्यांनी सुरुवातीस मुंबईतील शासकीय एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये संस्कृत विषयाचे प्राध्यापक म्हणून काम केले. या काळात त्यांनी एलएलबी पदवी प्राप्त केली तसेच मुंबई विद्यापीठात प्रबंध सादर केला.

पुढे नागपूरच्या मॉरिस कॉलेजात व नंतर अमरावती येथील किंग एडवर्ड कॉलेज येथे संस्कृत या विषयाचे प्राध्यापक व प्राचार्य म्हणून सेवानिवृत्तीपर्यंत काम केले. नागपूर विद्यापीठात (आताचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर) त्यांनी सन्मान्य व गुणश्री प्राध्यापक म्हणून काम केले. काही काळ तेथील पदव्युत्तर मानव्यशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी स्वीकारली. नागपूरमधील ‘विदर्भ संशोधन मंडळ’ या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. या संस्थेचे ते कार्याध्यक्ष होते. प्राचीन शिलालेख, नाणी आणि अभिजात प्राचीन संस्कृत साहित्य ही त्यांची प्रमुख कार्यक्षेत्रे. त्यांनी वाकाटकांच्या ताम्रपटांचा आणि शिलालेखांचा मागोवा घेऊन सध्याचे रामटेक म्हणजेच मेघदूतातील रामगिरी होय, असा सिद्धांत मांडला. हा सिद्धांत त्यांनी मेघदूतातील रामगिरी अर्थात रामटेक या नावाने प्रकाशित केला. खुद्द रामटेकला रामगिरीस्वामींचा उल्लेख असलेला वाकाटक राणी प्रभावती गुप्ता हिचा शिलालेख एका वाकाटककालीन मंदिरात १९८०च्या दशकात सापडला, तो या सिद्धांताला पूरक ठरला. त्याचप्रमाणे अजिंठ्याच्या लेणे क्रमांक १६ येथील वाकाटक लेखाचे वाचन करून नंदिवर्धन (विद्यमान रामटेकजवळील नगरधन) व वत्सगुल्म (विद्यमान वाशिम जिल्ह्याचे ठिकाण) या ठिकाणी वाकाटक राजवंशाच्या दोन शाखा होत्या हे सिद्ध करून त्यांनी वाकाटक वंशावळ निश्चित केली. अजिंठ्याच्या लेखातील ‘सुवीथि’ या शब्दाचे योग्य वाचन करून अजिंठ्याच्या लेणी क्रमांक १६,१७,१९ व २१मधील भित्तिचित्रे वाकाटकांच्या कारकिर्दीत काढली गेली हे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या या प्रदीर्घ व सखोल संशोधनाचा गुणगौरव ‘वाकाटकांच्या इतिहासाचे अधिकारी’ असा उल्लेख आढळतो.

शिलालेख व ताम्रपट यांच्या अचूक वाचनाबरोबरच नाणकशास्त्रातही त्यांनी अजोड कामगिरी केली. संस्कृत साहित्यातील त्यांचे विशेष योगदान त्यांच्या कालिदास, भवभूती, हर्षचरितसार आणि लघुकौमुदी या पुस्तकांतून दिसून होते. याशिवाय त्यांनी संशोधन मुक्तावलिमधून अनेक संशोधनात्मक लेख लिहिले.

कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम् या ग्रंथमालेचे मिराशी हे पहिले भारतीय संपादक होत. या नियतकालिकेतील परंपरेतूनच त्यांनी कलचुरी नृपति आणि त्यांचा काल, वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, सातवाहन व पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख इत्यादी प्राचीन राजवंशांवरील ग्रंथ लिहिले. त्यांना अनेक शिष्यवृत्त्या, पारितोषिके, पदव्या, मान–सन्मान, पुरस्कार लाभले.नागपूर येथे ३ एप्रिल १९८५ रोजी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. (साभार : इंटरनेट)

**क्लिक...क्लिक...!**




**पनवेल : कडक उन्हात महामार्गालगत असलेल्या झाडांवरील फुले अत्यंत सुरेख दिसत असतात.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात घामामुळे पायांना दुर्गंधी येतेय? मग ‘हे’ करा

उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. वाढत्या उन्हामुळे घाम येण्याचे प्रमाण वाढू लागलेय. या घामाच्या त्रासामुळे खूप हैराण व्हायला होते. केसांत, काखेतून खूप घाम येतो. हात घडी करून बसलं तरी हाताला घाम सुटतो. इतकेच नाही, तर पायांना सतत घाम येतो. घामामुळे पायांना येणाऱ्या तीव्र दुर्गंधीने त्रास होऊ लागतो. यावर बंगळुरूमधील त्वचाविज्ञान डॉ. रस्या दीक्षित यांनी काही टिप्स सांगितल्या आहेत, ज्यांच्या मदतीने तुम्ही उन्हाळ्यात घामामुळे पायांना येणारी दुर्गंधी दूर करू शकता आणि नेहमी फ्रेश राहू शकता.



योग्य फूटवेअर निवडा : घाम येतो तेव्हा शरीराच्या इतर भागांपेक्षा पायांमध्ये जास्त प्रमाणात जीवाणू वाढतात. त्यामुळे पायांमधून घामाची अधिक दुर्गंधी येते. त्याच वेळी जेव्हा तुम्ही उन्हाळ्यात पूर्ण पॅकबंद शूज किंवा पावले पूर्णपणे झाकले जातील, अशी चप्पल घालता तेव्हा अधिक घाम येतो; ज्यामुळे जीवाणूंची संख्यादेखील वाढते आणि दुर्गंधी येते. त्यामुळे उन्हाळात पाय मोकळे राहतील आणि हवा बाहेर जाऊ शकेल अशा प्रकारे फूटवेअर निवडा. त्यामुळे दुर्गंधीपासून सुटका होऊ शकते.

मोजे घाला : तुम्ही उन्हाळ्यात पाय मोकळे राहतील, अशी चप्पल घालत नसलात तरी मोजे घाला. शूज वापरणाऱ्यांनी तरी मोजे घातलेच पाहिजेत आणि दररोज ते बदलले पाहिजेत. या पद्धतीचा अवलंब करून, तुम्ही तुमच्या पायांना येणारी दुर्गंधी कमी करू शकता.

स्वच्छतेकडे लक्ष द्या : काम संपवून घरी परतल्यावर पाय साबणाने धुवा. त्यानंतर कपड्याच्या साह्याने पाय कोरडे होईपर्यंत पुसा. विशेषत: पायांच्या बोटांच्या गॅपमध्ये पाणी राहू देऊ नका. त्याशिवाय पायांच्या बोटांची नखे नियमितपणे कापल्यासही पायांची संपूर्ण स्वच्छता राखण्यास मदत होते.

डॉक्टरांचा सल्ला घ्या : वेळोवेळी पायांकडे लक्ष देत राहा. विशेषत: पायांच्या बोटांमधील कॅपमध्ये काही लक्षणे दिसत नाहीत ना हे तपासा. तुम्हाला पायांच्या तळव्याजवळ काळे किंवा पांढरे डाग यांसारखी बुरशीजन्य संसर्गाची लक्षणे दिसली, तर तत्काळ त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घ्या. त्वचाशास्त्रज्ञांच्या मते जर तुम्हाला बुरशीजन्य संसर्ग होण्याची शक्यता असेल, तर मोजे घालण्यापूर्वी डॉक्टरांच्या सल्ल्याने बुरशीनाशक पावडर वापरा. प्लास्टिकची चप्पल वापरणे टाळा, कारण अशा चपलांमुळे अधिक घाम येतो. त्यासह सुती कापडाचे मोजे घाला.

# खासदार सुनील तटकरेंसाठी महायुतीचा होम टू होम प्रचार

## आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे नियोजन

**पाली : प्रतिनिधी**

देशात लोकसभा निवडणुकीचे वारे वेगाने वाहू लागले आहे. महाराष्ट्रात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी, वंचित बहुजन आघाडी संघर्ष पहायला मिळणार आहे. रायगड लोकसभा मतदारसंघात महायुतीचे सुनील तटकरे तर महाविकास आघाडीचे अनंत गीते यांच्यात मुख्य लढत होणार आहे. अशातच सुनिल तटकरे यांच्या प्रचारार्थ महायुती आघाडीवर असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.



आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना युवा सेना प्रमुख संजय म्हात्रे व पदाधिकारी यांनी ग्राउंडवर प्रचारास सुरवात केलीय. रायगड मतदारसंघात प्रचाराची रणनीती ठरली असून होम टू होम प्रचार करून सुनील तटकरे यांना पुन्हा खासदार करण्यासाठी शिवसेनेने कंबर कसली आहे. महायुतीचा प्रत्येक उमेदवार मोठ्या मताधिक्याने जिंकला पाहिजे यासाठी महायुतीतील प्रत्येक घटक पक्ष, नेतेमंडळी, पदाधिकारी जोमाने कामाला लागले आहेत . सर्वांचे लक्ष असलेला, आणि विजयाच्या खात्रीची मते देणारा पेण सुधागड रोहा मतदारसंघावर आता शिवसेनेने लक्ष केंद्रित केले आहे. या मतदारसंघातून अधिक मताधिक्य देण्याचा निर्धार शिवसेनेने केला आहे.

या वेळी झालेल्या बैठकीत युवा सेना जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे यांनी सांगितले की शिवसेना पक्ष प्रमुख एकनाथ शिंदे, आमदार महेंद्र दळवी यांच्या आदेशानुसार आपल्याला महायुतीचे उमेदवार सुनिल तटकरे यांना निवडून आणायचे आहे. शिवसेना पक्षाचा एकदा आदेश आला की सच्चा शिवसैनिक या नात्याने प्रत्येक शिरोधार्ह मानून त्याचे पालन करण्याची भूमिका आपण घेतलीच पाहिजे. हेवेदावे मतभेद विसरून एकदिलाने काम करण्यासाठी सर्वांनी सज्ज व्हावे. लोकसभा निवडणुकीत आपली ताकत दाखवून देऊया, एक एक मत महत्वाचे आहे. आपण युतीचा धर्म प्रामाणिकपणे पाळून काम करूया, भविष्यात विधानसभा निवडणुकित सुनील तटकरे हे देखील युती धर्म पाळतील असा विश्वास आहे. राष्ट्रवादी आणी शिवसेना पदाधिकारी यांनी समन्वय ठेऊन काम करूयात. अलिबाग मुरुड मतदारसंघात आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वात तटकरे यांच्या पारड्यात मोठे मताधिक्य मिळेल, तर महाड पोलादपूर माणगाव मतदारसंघात आमदार भरत गोगावले यांच्या नेतृत्वात तटकरे यांना मोठे मताधिक्य मिळेल, तर पेण सुधागड रोहा मतदारसंघात देखील शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी च्या माध्यमातून मोठी ताकत सुनिल तटकरे यांच्या पाठीशी उभी राहील.

या वेळी आमदार अनिकेत तटकरे, युवा सेना जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे, पेण तालुकाप्रमुख तुषार मानकवळे, संपर्कप्रमुख यशवंत मोकल, शहर प्रमुख दिनेश पाटील, युवा सेना तालुकाप्रमुख रोहन म्हात्र, उप तालुकाप्रमुख सचिन गोरडे, विभाग प्रमुख नंदकुमार पाटील, विलास कोळी, नरेश शिंदे, प्रमोद घरत, चंद्रकांत पाटील , प्रवीण जाधव, जीवन पाटील, अमोल म्हात्रे, दत्ता वाघमारे, वंदनाताई पाशीलकर, मानसी ताई ढवळे, प्रकाश खोपडे आदींसह पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

### 'महायुतीच्या माध्यमातून अनेक विकासकामे'

***खासदार सुनील तटकरे आणि आमदार महेंद्र दळवी यांच्या माध्यमातून लोकाभिमुख, विधायक आणि तालुक्या तालुक्यात गाव खेड्या पाड्यात विकासकामे मोठ्या प्रमाणावर झाली आहेत. अनंत गीते हे सहा वेळा खासदार असताना त्यांनी कोणाला रोजगार दिला, विकासकामे किती केली हा प्रश्न त्यांना विचारण्याची वेळ स्थानिक नागरिकांवर आली आहे. आपण लोकसभा निवडणुकीत जास्तीत जास्त जनतेत पोहचून आपल्या महायुतीची ताकत वाढवूया, असे आवाहन युवा सेना जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे यांनी केले.***

# रोहा तालुक्यात शेकापला हादरा

## नंदकुमार म्हात्रे, लक्ष्मण महाले राष्ट्रवादीत

**धाटाव, पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नंदकुमार म्हात्रे, रोहा पंचायत समितीचे माजी सभापती लक्ष्मण महाले, सानेगाव ग्रा. पं. उपसरपंच परेश म्हात्रे यांच्या समवेत यशवंतखार सानेगाव भागातील शेकापच्या असंख्य कार्यकर्त्यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर झालेल्या घर वापसीमुळे शेकापला हदरा बसला आहे. तर पश्चिम खोऱ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद अधिक प्रमाणात बळकट झाली आहे.

सुतारवाडी येथील गीताबाग कार्यालयात मंगळवार (दि. २) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने पक्ष प्रवेश कार्यक्रम झाला. या वेळी व्यासपीठावर महिला व बाल कल्याण मंत्री ना. अदिती तटकरे, आम. अनिकेत तटकरे, तालुका प्रमुख विनोद पाशीलकर, माणगांव तालुका अध्यक्ष सुभाष केकाणे, नरेंद्र जैन, संतोष भोईर, उत्तम नाईक, नवनीत डोळकर, संदीप चोरगे, मयूर खैरे इत्यादी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काही दिवसापूर्वी राज्याचे कृषीमंत्री ना. धनंजय मुंढे यांच्या प्रमुख उपस्थित खासदार सुनील तटकरे यांच्या खंबीर नेतृत्वावर विश्वास ठेवून मुरूड तालुक्यातील शेकापचे नेते मनोज भगत आपल्या हजारो कार्यकर्त्यासमवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. हि पक्ष प्रवेशाची मालिका खंडीत न करता आता पश्चिम खोऱ्यातील खासदार सुनील तटकरे साहेबांचे जुने स्वनंगडी व मित्र मंडळी तटकरे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी शेकापला सोडचिट्टी देऊन पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. अशा पद्धतीने शेकापला खऱ्या अर्थाने उतरती कला लागली आहे. शेकापला लागलेली गलती थांबण्याचा काय नावं घेत नाही. 'ए तो ट्रेलर है पिक्चर अभि बाकी है.' असे सांगत आमदार अनिकेत तटकरे यांनी शेकापच्या नेतृत्वावर हल्लाबोल केला.

मी आणि माझे सोबतीचे कार्यकर्ते २४ तास लोकांत राहून जनतेची कामे करतो. मी शेकापच्या नेत्यावर नाराज नाही पण त्या पक्षात काम करणारी मंडळी नसल्यामुळे काम करणे अवघड वाटत असे. तर दुसरीकडे रायगड लोकसभा मतदार संघातून खासदार सुनील तटकरे यांच्या नावानी घोषणा झाली.

मी आणि महालेसाहेब यांनी तटकरे साहेबांसोबत अनेक वर्षे कामे केली आहेत. या निवडणुकीत साहेबांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊन नये तसेच तटकरेसाहेब जास्तीत जास्त मतांनी निवडून यावेत यासाठी मी आणि महाले व त्याचप्रमाणे इतर सहकारी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. लोकसभेत निवडणुकीत साहेब पुन्हा एकदा भरघोस मतांनी निवडून जातील असा विश्वास माजी जि. प. सदस्य नंदकुमार म्हात्रे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना बोलून दाखवला आहे.




# जिल्हाधिकाऱ्यांनी केली मतदान केंद्रांची पाहणी

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता ७ मे २०२४ या दिवशी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मुरुड तालुक्यातील कोर्लई, सुरूई, मांडला, म्हाळुंगे, भोईघर, बारशीव मतदान केंद्रांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किशन जावळे यांनी भेट दिली.

या वेळी मुरूड तहसीलदार-रोहन शिंदे, निवडणूक नायब तहसीलदार- शेखर खोत, मंडळ अधिकारी- तुषार काकडे, तलाठी-वृषाली पाटील. संदेश पाटील, अमृत चोगले आदींसह अधिकारी उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किशन जावळे यांनी अधिकाऱ्यांशी मतदान केंद्रावरील सुविधांबाबत चर्चा केली दिव्यांग व जेष्ठ नागरिकांसाठी पुरविण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती घेतली तसेच रॅम्प, व्हिलचेअर, पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छता गृह, प्रथमोपचार पेटी आदिंसह सुविधा मतदान केंद्रावर असाव्यात यांची पाहणी केली.तसेच स्थानिक नागरिकांशीसुद्धा संवाद साधला.

मतदान केंद्रावर काळोख नसावा सूर्यप्रकाश असावा जर तसे होत नसेल तर पर्याय म्हणून वीज व्यवस्था सक्षम ठेवण्यात यावी असे आदेश यावेळी संबंधित अधिकारी वर्गास जिल्हाधिकरी यांनी दिले आहेत.



# खालापूर निबंधक कार्यालय पाच दिवसात मालामाल

## विक्रमी महसूल जमा

**खोपोली : प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष संपताना खालापूर निबंधक कार्यालय मालामाल झाले असून अवघ्या पाच दिवसात सहा कोटी ६७ लाख ७८ हजार ३२० रुपये तिजोरीत जमा झाले आहेत.

मार्चअखेर असल्याने शासनाने सुटीच्या दिवशीही नोंदणी विभागाची कार्यालये सुरू ठेवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार दुय्यम निबंधक कार्यालयात गुड फ्रायडे, शनिवार व रविवार या सुटीच्या दिवशीदेखील दस्तांची नोंदणी करण्यात आली. सुट्टीचे दिवसाच्या आठवड्यात १०२ दस्त नोंदणी झाले आहे. एकूण मुद्रांक शुल्क व नोंदणी फीच्या रूपाने सहा कोटी ६७ लाख ७८ हजार ३२० रुपये महसूल रुपाने जमा झाले. खालापूर, दुय्यम निबंधक विक्रांत आंब्रस्कर यांनी फेब्रुवारीत कार्यभार स्वीकारल्यानंतर उत्तम व्यवस्था ठेवत कर्जदारांना तसेच मालमत्ताधारकांना नोंदणी प्रक्रिया सुलभ करून दिली असून दस्तनोंदणी गतिमान झाली आहे.

# राजिप भैरव शाळेचा शताब्दी महोत्सव

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा भैरवचा शताब्दी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शाळेची डागडुजी रंगरंगोटी करण्यात आली होती.




या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थ मंडळ भैरव, शिक्षक वृंद, अतिष सागळे, रमेश सागळे, अमर सागळे, रूपेश मोरे, काशिनाथ सागळे, संदीप सागळे, सुधीर सागळे, सुधीर नेमाणे, भारती सागळे, मुख्याध्यापक रश्मी लखीमले, शिक्षिका जान्हवी दंत तसेच आजी माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी भैरव, वाफेघर, खुरावले, चिवे, आवढे, वाघोशी, कुंभार घर, कवेले, तोरणपाडा, खांडपोली व कामथेकरवाडी या गावातील आजी व माजी विद्यार्थी उपस्थित होते. माझे गाव माझा अभिमान/माझी शाळा माझा स्वाभिमान हे ब्रीद शताब्दी महोत्सवावेळी सर्वांनी प्रत्यक्षात आणले. या वेळी विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून आपल्या कला सादर करून उपस्थित मान्यवरांचे मनोरंजन केले.

या कार्यक्रमानिमित्त आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १००हून अधिक नागरिकांनी याचा लाभ घेतला. उपस्थित जेष्ठ नागिकांचा सन्मान चिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमातून आपल्या कला सादर करून उपस्थित मान्यवरांचे मनोरंजन केले. या कार्यक्रमासाठी या कार्यक्रमाला प्रमुख पाली पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक श्री. बालवाडकर, सामाजिक कार्यकर्ते दिपक पवार, नगरसेवक पराग मेहता, उद्योजक संजय सागळे, सामाजिक कार्यकर्ते रमेश सागळे, सर्व जेष्ठ शिक्षक, सतीश देशमुख, मुख्याध्यापिका शाळा भैरव रश्मी लखिमळे, व्यवस्थापक शाळा कमिटी भैरव आदींसह विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक राजेश गायकवाड यांनी केले.

# रोठ बुद्रुकचे हरिभाऊ घाग सेवानिवृत्त

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोठ बुद्रुक ग्रामपंचायत कर्मचारी हरिभाऊ घाग हे रविवारी (दि. ३१) सेवानिवृत्त झाले. महिला कार्यशाळा सभागृहात ग्रामपंचायत सरपंच व कमिटी तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत हरिभाऊ घाग यांचा भेटवस्तू, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थ, पत्रकार, प्रतिष्ठीत नागरिक व कर्मचारी उपस्थित होते.

२००६मध्ये त्यांची ग्रामपंचायतीमध्ये माळी कर्मचारी म्हणून त्यांची भरती झाली. १८ वर्षे त्यांनी सेवा केली या सेवेत असताना आपली सर्व कर्तव्ये चोखपणे झाली. इतकी वर्षे सेवा करित असताना गावात संगळ्याशी मिळून मिसळून राहत होते. त्यांची गावातून ढोल ताशांच्या नाचत गजरात मिरवणूक काढण्यात आली. ग्रामपंचायत ते श्री क्षेत्र भवानी गावदेवी मंदिर, गावची वेशीपासून ते घरापर्यंत मिरवणूक काढली. या मिरवणुकीदरम्यान महिलांनी त्यांचे औक्षण केले.

भाजप रोहा तालुकाध्यक्ष तथा रोठ बुद्रुक ग्रामपंचायत सदस्य अमित घाग यांनी, आमचे पप्पा हे आज सेवानिवृत्त जरी झाले असतील तरीही ते ग्रामपंचायतीच्या व गावाच्या मदतीला वेळप्रसंगी हजर असतील हे मात्र नक्की आहे, असे सांगितले. माजी सरपंच ज्ञानेश्वर साळुंखे यांनीही या वेळी आले मत व्यक्त केले.



# विवाहित महिलेची उल्हास नदीत उडी; ग्रामस्थांनी वाचवला जीव

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ दहिवली उल्हास नदीवरील पुलावरून एका ३६ वर्षीय विवाहित महिलेने पाण्यात उडी घेत आपले जीवन प्रवास संपविण्याचा प्रयत्न केला. येथील स्थानिक ग्रामस्थांनी वेळीच महिलेला सुखरूप पाण्याबाहेर काढल्याने पुढील मोठी दुर्घटना टळली असून महिला सुखरूप आहे. त्या महिलेला उपचारासाठी बदलापूर येथे रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

नेरळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नेरळ कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील हजारे नगर येथे नैना मयूर सूर्यवंशी ही छत्तीस वर्षीय विवाहित महिला आपल्या पतीसोबत राहत आहे. नैना घरातून एकटीच बाहेर पडली होती. या वेळी नैना ही दहिवली तर्फे वरेडी या ग्रामपंचायत हद्दीत येत असलेल्या उल्हासनदीवरील दहिवली पुलावर काही लोकांना दिसली. या वेळी नैनाने कसला ही विचार न करता पुलावरून उल्हास नदीच्या पाण्यात उडी मारून आपला जीवन प्रवास संपविण्याचा प्रयत्न केला. नैनाला पाण्यात उडी घेताना पाहिले असता काही जागरूक ग्रामस्थांनी पाण्यात उडी घेत नैनाला बाहेर काढले व लागलीच नेरळ पोलिसांना माहिती दिली.

पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत महिलेला नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र येथे दाखल केले. याबाबत तीचे पती मयूर सूर्यवंशी याला माहिती देण्यात आली होती. नैनाच्या शरीरावर जखमा झाल्या होत्या. ती बेशुद्ध होती. त्यामुळे तिला उपचारासाठी दाखल करण्यात आले.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायम स्वरुपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १० | १/क | ०-३५-००<br>पो.ख.०-११-००<br>एकूण ०-४६-०० | ७.७५ | श्री. कृष्णकांत सोनू बोभाटे |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :- ०२/०४/२०२४**

**सही**
**ॲड. एस. के राणे**
पत्ता : ऑफिस नं. १२३, पहीला मजला,
म्युन्सीपल कॉम्पलेक्स, भाजी मार्केट जवळ,
पनवेल, जि. रायगड, ९८१९८६९२१२

# बेकायदा सिमेंट प्रकल्पामुळे प्रदूषणात वाढ

## तुर्भे एमआयडीसीतील ७५ टक्के रहिवाशांना क्षयरोग व दमा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे एमआयडीसी परिसरातील सिमेंट मिक्सर प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढत होते. परिणामी, नागरिकांच्या तक्रारीनंतर हा प्रकल्प बंद करण्यात आला नाही. कोणत्याही सिमेंट प्रकल्पाला प्रदूषण नियंत्रण मंडळाने परवानगी न देता राजेरोसपणे हे प्रकल्प सुरु आहेत. हे प्रकल्प बंद करण्यासाठी नागरिकांन कडून वारंवार प्रदूषण मंडळाकडे लेखी तक्रारी करण्यात आल्या आहेत. पण तक्रारी करूनदेखील घातक प्रकल्प सुरू आहेत.



सिमेंट मिक्सर प्रकल्प सध्या तुर्भे एमआयडीसीमधील रहिवाश्यांच्या आरोग्याला घातक ठरू लागले आहेत. या प्रकल्पामुळे इंदिरा नगर, गणपती पाडा, बोनसरी गाव सह बंद दगड खाणी परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून ७५ टक्क्याहुन अधिक नागरिकांना क्षयरोग व दमा झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

प्रदूषण मंडळाने तत्काळ ही कारवाई करावी, अशी मागणी संतप्त नागरिकांकडून होऊ लागली आहे. सध्या ज्या ठिकाणी सिमेंट मिक्सर प्रकल्प उभे आहेत. त्या ठिकाणी बंद दगड खाणीची धडधड सुरू होती, मात्र या दगड खाणी पर्यावरणाला घातक असल्याने हरित लवादकडून बंद करण्यात आल्या. एकीकडे गेल्या काही महिन्यांन पासून नवी मुंबईच्या प्रदूषणात कमालीची वाढ होताना दिसत आहे. त्यातच शहरात वाढती धूळ ही आरोग्यावर विपरीत परिणाम करत आहे, मात्र काही वर्षापासून तुर्भे, पावणे व महापे याठिकाणी सुरू असणाऱ्या सिमेंट काँक्रीट प्रकल्प (आरएमसी प्लांट) मुळे धुळीचे प्रमाण भरमसाठ वाढले आहे. प्रदूषणात धुलीचे प्रमाण वाढल्याने त्याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ लागल्याने अनेकाना दमा व क्षयरोगाची लागण झाली आहे. एकट्या इंदिरानगर परिसरात ७५टक्के नागरिकांना क्षयरोग व दमा झाल्याने अनेकांवर मनपाच्या नागरी आरोग्य केंद्रासह वाशी येथील प्रथम संदर्भ रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

या प्लांटमुळे छोटे छोटे धूलिकण हवेत मिसळतात. तसेच धूळ सुध्दा मोठ्या प्रमाणात हवेतून पसरते. त्यामुळे धूळ व धुली कणामुळे मानवी जीवसृष्टी ला श्वसनाचा आजार होतो. तर हृदयाचा आजार असलेल्या रुग्णाला तर मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागतो, असे डॉ. राजेश पाटील यांनी सांगितले.

### सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांवर नजर

महापालिकेने ही ठिकठिकाणी सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांसह अन्य विकास कामेही हाती घेतली आहेत. त्यातूनही धूळ निर्माण होत आहे. त्यासाठी कंत्राटदारांनी बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पाणी फवारणी यंत्रे बसवणे, हिरवी जाळी बसवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**ज्या सिमेंट प्रकल्पामधून वायू प्रदूषण वाढत असेल त्या प्रकल्पा च्या ठिकाणी पाहणी केली जाईल अणि पुढील कारवाई केली जाईल.**
**–सतीश पडवळ,**
**उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, नवी मुंबई**

# जेएनपीएमध्ये ज्वलनशील पदार्थांच्या कंटेनरला आग



**उरण : प्रतिनिधी**

जेएनपीए बंदरात एक्सपोर्ट करण्याच्या तयारीत असलेल्या एका ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या कंटेनरला पहाटे सुमारास भीषण आग लागली. जेएनपीएच्या अग्नीशमन दलाच्या जवानांनी शर्थीच्या प्रयत्नातून शिताफीने आग आटोक्यात आणल्याने बंदराच्या प्रवेशद्वारावरच स्फोट सदृश परिस्थिती टळली.

पुढील अनर्थ टळला असला तरी वाहतूकदार कंपनीच्या बेफिकीरीपणामुळेच ही घटना घडल्याचे निदर्शनास आल्यानंतर याबाबत तातडीने कारवाईची करण्याबाबत जेएनपीए प्रशासनाला कळविण्यात आले आहे. जेएनपीए बंदरातुन हायड्रोजन पेट्रोलियम हा अति ज्वलनशील पदार्थ एक्सपोर्ट करण्याच्या तयारीत होता. ट्रेलर (एमएम–४६ – बीएम ५६३९) मधुन २० फुटी दोन कंटेनरमधुन यांची वाहतूक केली जात होती. अति ज्वलनशील पदार्थांचे भरलेले ड्रम घेऊन कंटेनर ट्रेलरने जेएनपीए बंदराच्या सेंट्रल गेटमधून आत प्रवेश करुन १०० मीटर अंतरावर गेलेल्या अति ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या कंटेनरने सोमवारी पहाटे चार वाजताच्या अचानक पेट घेतला. आग लागल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर वाहनचालकाने पेटलेल्या ज्वलनशील कंटेनरसह ट्रेलर बंदराच्या प्रवेशव्दारा बाहेर काढले.

आगीची माहिती मिळताच जेएनपीएच्या अग्निशमन दलाच्या जवानांनी घटना स्थळी धाव घेतली. तोपर्यंत ज्वलनशील पदार्थ असलेला कंटेनर आगीच्या भक्ष्यस्थानी पडला होता. आगीच्या ज्वाळांनी वेढलेल्या कंटेनरमधुन ज्वलनशील पदार्थांचे ड्रम धडामधूम आवाज करीत फुटू लागल्याने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले होते. जेएनपीएच्या अग्नीशमन दलाच्या जवानांनी शर्थीच्या प्रयत्नातून फोम, पाण्याचा मारा करून मोठ्या शिताफीने आग आटोक्यात आणली. यामुळे बंदराच्या प्रवेशद्वारावरच स्फोट सदृश परिस्थिती टळली.

ज्वलनशील पदार्थाचा पेट घेतलेला हा धोकादायक कंटेनर प्रवेशद्वारातून कोणतीही परवानगी न घेता बाहेर काढण्यात आला असल्याचे सुरक्षा रक्षकांकडून सांगण्यात येत आहे. तर बंदरात धोकादायक हजरडस्ट रसायनाची वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांनी कोणत्या प्रकारची खबरदारी घ्यावी यासाठी नियम लागू केले आहेत, मात्र कोणत्याही प्रकारच्या नियमांचे पालन न करताच वाहनचालकांने ज्वलनशील पदार्थाचा पेटलेला कंटेनर प्रवेशद्वारातून आत आणि बाहेर काढून बंदराची सुरक्षाच धोक्यात आणली होती. सुदैवाने वेळीच पेटलेल्या ज्वलनशील पदार्थांच्या कंटेनरला लागलेली आग वेळीच आटोक्यात आणण्यात जेएनपीएची अग्नीशमन यंत्रणा यशस्वी ठरली. त्यामुळेच बंदर परिसरात स्फोटसदृश घटना टळली.

याबाबत तातडीने तक्रार करून डेप्युटी कंन्झुवेटर यांच्याकडे कारवाईची करण्याबाबत जेएनपीए प्रशासनाला कळविण्यात आले असल्याची माहिती जेएनपीए कामगारांनी दिली आहे, मात्र डेप्युटी कंन्झुवेटर बाळासाहेब पवार यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नसल्याने नेमकी वस्तुस्थिती कळली नाही.

# नळ जोडणीवर जलमापक बसविण्याच्या सूचना

**पनवेल : वार्ताहर**

ग्राहकांनी नळ जोडणीवर जलमापक बसविण्याच्या सूचना पनवेल महापालिकेच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

पनवेल महापालिकेमार्फत पनवेल शहर व २९ गावांतर्गत गृहसंकुल, सोसायट्या, घरे चाळी, उपहारगृहे, शाळा, कॉलेजमध्ये सर्व ग्राहकांच्या नळ जोडणीवर जनमापक बसवण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. हे जलमापक बसविल्यानंतर पाण्याची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. जलमापक बसवल्याने नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण होणार आहे. सध्या सोसायटीला किंवा स्वतंत्र घर असणाऱ्यांना पनवेल महापालिका पाणीपुरवठा विभागामार्फत जलमापक खरेदी करण्यास सांगत येत होते, परंतु पनवेल महापालिकेमार्फत ग्राहकांना कोणतेही प्रकारचे शुल्क न करता विनाशुल्क जलमापक बसवण्यात येणार आहेत. हे जलमापक अचूक व योग्य असून सर्व तांत्रिक निकष हे पनवेल महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत तपासणी करून घेण्यात आलेले आहेत.

जलमापक बसवल्यानंतर देखभाल व दुरुस्ती तीन वर्षांपर्यंत पनवेल महापालिकेमार्फत करण्यात येणार आहे, त्यामुळे ग्राहकांवर कोणत्याही प्रकारचा आर्थिक बोजा येणार नाही. पनवेल महापालिकेने घेतलेला निर्णय हा ग्राहकांच्या व पनवेल महापालिकेचा हिताचा असून जलमापक बसवल्याने पाण्याचा गैरवापर आळा बसेल. त्यामुळे जलमापक बसवण्याच्या सुचना पनवेल मनपाने केल्या आहेत.

# मोफत आरोग्य तपासणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथे असंघटीत महिला कामगार संघटना व धिरज पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हा उपक्रम संस्थेचे संस्थापक अध्यक्षा राजश्री येवले यांनी त्यांच्या सानपाडा सेक्टर ८ येथील यशोवर्धन सोसायटीच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित केला होता. तब्बल २५० पेक्षा जास्त नागरिकांनी या सहभाग नोंदवला.

या शिबिरात सर्दी, ताप, दमा, खोकला, मधुमेह, व हिमोग्लोबिन ब्लड प्रेशर, सांधेदुखी, गुडघेदुखी कंबरदुखी या आजारांची तपासणी करण्यात आली. मोफत डोळे तपासणी करून चष्मे वाटप करण्यात आले. तसेच विविध आजाराविषयी मार्गदर्शन करून औषधे दिली गेली.



# कोपरखैरणेत दुरुस्ती कामांमुळे वाहतूक कोंडी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

तीन टाकी प्रवेशद्वारासमोर दरवर्षीप्रमाणे यंदाही व्हॉल्व दुरुस्ती सुरू केली आहे. त्यामुळे रस्ता, पदपथ सर्वच ठिकाणी मातीचे ढिगारे उभे राहिल्याने पादचाऱ्यांना पदपथाचा वापर करता येत नाही, तर दुसरीकडे मुख्य चौकापासून पंधरा–वीस फुटांवर ही दुरुस्ती होत असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे.



दुरुस्ती करताना माती टाकण्यासाठी जागा असताना रस्ता आणि पदपथावर माती टाकल्याने गेल्या आठ दिवसांपासून नागरिकांना हा मनस्ताप सहन करावा लागत आहे. कोपरखैरणेत सर्वाधिक पाणीपुरवठा तीन टाकी, सेक्टर १७ येथून केला जातो. त्यामुळे या तीन टाक्या जेथे आहेत त्या परिसराला तीन टाकी असे नाव पडले आहे. याच तीन टाकी पाणीपुरवठा कार्यालयास दोन प्रवेशद्वारे असून त्यापैकी एका प्रवेशद्वाराच्या बाहेरील भूमिगत व्हॉल्व दुरुस्तीचे काम आठ दिवसांपासून केले जात आहे. यासाठी दोन मोठे खड्डे खोदण्यात आले आहेत.

एखाद्या ठिकाणची अशा प्रकारे वर्षातून किमान दोन–तीन वेळा दुरुस्ती केली जात असली तरी पाणीगळती कायम अशी स्थिती कदाचित फक्त याच ठिकाणी होते. या वेळी मात्र मोठ्या प्रमाणात दुरुस्ती काढल्याचे चित्र दिसत असून निदान आता तरी कायमस्वरूपी दुरुस्ती व्हावी अशी आशा व्यक्त केली जात आहे. याला महत्त्वाचे कारण म्हणजे या परिसरात अनेक शाळा, महाविद्यालये, राष्ट्रीयीकृत बँक, हॉटेल्स, बेकरी, फर्निचर अशा सर्वच प्रकारच्या आस्थापना असल्याने मोठ्या प्रमाणात रहदारी असते. त्यात हा रस्ताही कमी पडतो, मात्र व्हॉल्व दुरुस्ती करताना कंत्राटदार किंवा मनपाच्या संबंधित विभागाला याचे काहीही गांभीर्य नाही असे दिसून येत आहे. कारण व्हॉल्व दुरुस्ती करताना अर्ध्या रस्त्यात मातीचे ढिगारे आहेतच, शिवाय पदपथावरही मातीचे ढिगारे एवढे टाकण्यात आलेत की चालता येणे शक्य नाही. त्यामुळे गर्दीच्या वेळी प्रचंड वाहतूक कोंडी होते.

अशा प्रकारच्या दुरुस्तीवेळी नागरिकांची गैरसोय होते, पण सर्वच जण सहकार्य म्हणून सहनही करतात. या ठिकाणी चार पावले लांब म्हणजे प्रवेशद्वाराच्या आत जर खणलेली माती टाकली असती तर पादचाऱ्यांना सहज पदपथाचा वापर करणे शक्य झाले असते. तसेच एवढ्या मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडीही झाली नसती, अशी प्रतिक्रिया या परिसरातील रहिवासी संदीप राजपूत यांनी दिली. याबाबत कोपरखैरणे विभाग कार्यालयातील संबंधित विभागाला विचारणा केली असता योग्य ती पावले उचलण्यात येतील, असे उत्तर देण्यात आले.

# वाशीमध्ये माकडाचे वास्तव्य

**नवी मुंबई : बातमीदार**

मागील एक आठवड्यापासून वाशीच्या पुनर्विकास प्रकल्प सुरू असलेल्या रहिवाश्यांच्या संक्रमण इमारतीत एका माकडाने मुक्काम ठोकला आहे. काही केल्या हे माकड इथून हलायला तयार नाही. येथील रहिवासी प्रति हनुमान म्हणून त्याला खाऊ पिऊ घालत आहेत, पण त्याच्या उपद्रवी कृत्यांनीदेखील हैराण झाले आहेत.

वाशी अग्निशमन दलाकडे त्यांनी याबाबत दाद मागितली पण त्यांच्याकडे देखील यासाठी यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे तूर्तास या माकडाला सहन करण्याशिवाय येथील रहिवाश्यांना पर्याय उरलेला नाही.

वाशी सेक्टर १० येथे श्रद्धा सहकारी गृहनिर्माण संस्था यांच्या इमारतींच्या पुनर्विकास प्रकल्पाचे काम सुरू आहे. लगतच रहिवाश्यांकरिता संक्रमण संकुल उभारण्यात आलेले असून त्यात सुमारे ५० कुटुंब वास्तव्य करीत आहेत. तसेच बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या साईट जवळ काम करणाऱ्या मजुरांसाठी तात्पुरती पत्र्याची निवास व्यवस्था करून देण्यात आलेली आहे. मागील एक आठवड्यापासून वाट चुकलेले माकड येथील संक्रमण संकुल इमारतीत दाखल झाले आहे. काही केल्या ते तिथून हलेनासे झाले आहे.

### पाहण्यासाठी बघ्यांची गर्दी



संक्रमण इमारतीमधील कचऱ्याचे डबे उलथून टाकणे,पाणी साठवण केलेल्या टाक्यांची झाकणे उलथी पालथी करणे,कामगारांच्या घरात घुसून त्यांची भाजी,खाद्य पदार्थ व इतर जिन्नस खाणे किंवा अस्ताव्यस्त करणे, कधी बांधकाम सुरू असलेल्या इमारतीवर फेरफटका मारणे तर कधी संक्रमण इमारतीमधील प्रत्येक मजल्याच्या छज्ज्यावर बसून कुणी काही खायला देते का याची वाट पाहणे असे उपक्रम या माकड राजाचे सुरू आहेत. कधी कधी बिनधास्तपणे ते जमिनीवर येवून फेरफटका मारून जात आहे.

इमारतीत राहणारे रहिवाशी त्याला भगवान हनुमानाचे रूप समजून घरातील भाकरी, चपाती, केळी व इतर फळे खायला देत असली तरी त्यांची लहान तसेच तान्ही मुले आहेत,त्यांना या वानरापासून धोका संभवतो आहे, शिवाय ते इतर वस्तूंची नासधूस करत आहे ते वेगळेच आहे.

# मोहोपाड्यात नेत्र तपासणी

## शिबिराला ९० जणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासांबे (मोहोपाडा) येथील गणेश मंदिर, रसेश्वर मंदिर ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला, शंकरा आय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा श्रीगणेश मंदिराच्या सभागृहात नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते.




या शिबिराचा ९० जणांनी लाभ घेतला. शिबिराचे उद्घाटन डॉ. पदमनाथ पळणीटकर यांनी दीपप्रज्वलन करून केले. तसेच त्यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. रसेश्वर ट्रस्टच्या वतीने गणेश काळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शंकरा आय हॉस्पिटलच्या वतीने वैद्यकीय अधिकारी प्रकाश पाटील व त्यांचे सहकारी नेत्र तपासणीसाठी उपस्थित होते. या शिबिरात ९० लाभार्थ्यांनी लाभ घेतला. तसेच १४ लाभार्थ्यांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नवीन पनवेल येथील शंकरा हॉस्पिटल येथे रवाना करण्यात आले.

मोहोपाडा परिसरात यापुढे अशी अनेक आरोग्य शिबिर आयोजित केली जाणार असून परिसर मोतीबिंदूमुक्त करण्याचे ध्येय असल्याचे प्रकाश पाटील यांनी सांगितले. शिबिर यशस्वी करण्यासाठी रसेश्वर मंदिराच्या वतीने संदीप मुंढे, विश्वस्त गणेश काळे, दत्तात्रेय जांभळे, एकनाथ पाटील, कैलास म्हात्रे यांनी सहकार्य केले.

# दया पवार यांना पुरस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

नागपूर नगरीत सीताबर्डी येथील विदर्भ साहित्य संमेलन नथुराम, सभागृहात जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्यावतीने दिला जाणारा राज्यस्तरीय पद्मश्री दया पवार साहित्य पुरस्कार नवी मुंबई पोलिसांत गुन्हे शाखेत स्थित कार्यरत असलेले कवी, साहित्यिक उत्तम तरकसे असरडोहकर यांच्या शाईची नोंद या काव्यसंग्रहाला प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. श्रीपाल सबनीस, प्रा. डॉ. वैशाली प्रधान, ज्येष्ठ नाटककार डॉ. सुनील रामटेके, डॉ. विद्याधर बनसोड, दीपककुमार खोब्रागडे या मान्यवरांच्या हस्ते देऊन सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कार व सन्मान स्वीकारून कवी, साहित्यिक उत्तम दा तरकसे यांनी विचार व्यक्त केले.

# वकील अनुजा राणेला आचार्य पदवी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बँक ऑफ महाराष्ट्र पनवेलच्या माजी कर्मचारी राजश्री शिवराज राणे व पनवेल शहरातील सुप्रसिद्ध वकील शिवराज राणे यांच्या सुकन्या वकील अनुजा शिवराज राणे हिने कायदयातील सर्वोच्च आचार्य (पीएच.डी) पदवी प्राप्त केली.

अनुजाचा आचार्य प्रबंधाचा विषय Emerging perspective on constitutional morality in India : - critical study हा होता. ही आचार्य पदवी अमिटी युनिव्हर्सिटी महाराष्ट्र या विद्यापीठातून वकील अनुजा राणेनी प्राप्त केली आहे. ह्या पदवीसाठी डॉ. दीपश्री एस. चौधरी असोसिएट प्रोफेसर यांनी मार्गदर्शन केले.



तिच्या यशाबद्दल बँक ऑफ महाराष्ट्रचे माजी कर्मचारी, गुणवंत कामगार व विशेष कार्यकारी अधिकारी, अरविंद मोरे व त्यांच्या सुविद्य पत्नी डॉ. प्रा. नीलिमा अरविंद मोरे दाम्पत्यांनी वकील अनुजा राणेचा स्वलिखित पुस्तक कुतूहलाचा करिश्मा व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अरविंद मोरे म्हणाले की, एवढ्या लहान वयात पीएच. डी पदवी प्राप्त करणे ही खरोखर कौतुकास्पद बाब आहे. तिच्या ह्या कर्तृत्वामुळे तरुणाईला नक्कीच प्रेरणा मिळेल. तिच्या ह्या यशामुळे आई–वडील व राणे कुटुंबियांचे तिने नाव लौकिक केले आहे असे उदगारून वकील अनुजाचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

या वेळी दत्तकुमार सावंत, मामा, दिव्या सावंत, मामी, स्वाती सुनील सावंत, दुर्वा, दीपी आदी नातेवाईक उपस्थित होते. सर्वांनी वकील अनुजाचे अभिनंदन केले. वकील अनुजाच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# सुनील तटकरेंना बहुमताने निवडून आणणार

## भाजपच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा बैठकीत निर्धार

**पेण : प्रतिनिधी**

रायगड लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना प्रचंड बहुमताने निवडून आणण्याचा निर्धार पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी बैठकीत केला. भाजपच्या कार्यकत्यांची बैठक जिल्हा कमिटीचे सदस्य मोहन पाटील यांच्या निवासस्थानी पार पडली.



या वेळी बैठकीत जिते, हमरापूर, वाशी, झोतीरपाडा, पाबळ तसेच पेण नगरपालिका हद्दीतील एकूण २१० बुथवर प्रत्यक्ष जाऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या अनुषंगाने देशातील गरीब जनतेसाठी केलेल्या विकासकामांचा लेखाजोखा सभांद्वारे जनतेसमोर मांडण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. या माध्यमातून युतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांना बहुमत मिळविण्याचे उद्दिष्ट असणार असून सर्व कार्यकर्ते कामाला लागल्याचे मोहन पाटील यांनी सांगितले.

बुथनिहाय प्रचाराचा फायदा भविष्यात येणाऱ्या विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत महायुतीला उमेदवार निवडीसाठी होणार आहे, तसेच प्रत्येक बुथमध्ये महायुतीला ५१ टक्के मते कशी मिळतील या दृष्टीने प्रचार करण्यात येणार आहे.

या वेळी रायगड जिल्हा भाजप कमिटी सदस्य मोहन पाटील, भाजप कामगार आघाडी सेल अध्यक्ष वासुदेव पाटील, शिक्षक सेल अध्यक्ष हिरामण कोकाटे, माजी मंडळ अध्यक्ष प्रमोद कावतकर, माजी जिल्हा चिटणीस आनंद जाधव, पेण शहर सचिव मिलींद भोईर, माजी तालुका उपाध्यक्ष प्रणित म्हात्रे, जिल्हा किसान मोर्चा माजी अध्यक्ष जनार्दन नाईक, विकेश पाटील, माजी युवा मोर्चा सरचिटणीस कुणाल पाटील, एम.डी.पाटील डोलवी, माजी तालुका मंडळ उपाध्यक्ष, गणेश आंबेकर, माजी तालुका मंडळ उपाध्यक्ष आदी उपस्थित होते. या बैठकीपूर्वी भाजप कार्यकर्ते स्व. ॲड. प्रमोद म्हात्रे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# वन्यप्राणी व पक्षांसाठी जंगलातील नैसर्गिक पाणवठ्यांची साफसफाई

**पेण : प्रतिनिधी**

सध्या उन्हाची तीव्रता वाढत असताना नागरिकांना मोठ्या प्रमाणात उष्णतेचा सामना करावा लागत आहे. अनेक ठिकाणी वन्यप्राण्यांचे व पक्षांचे पाण्याअभावी हाल होत असल्याने अलिबाग उपवनसंरक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक, वनमजूर यांनी गावकऱ्यांच्या मदतीने पेण अंतर्गत येणाऱ्या जंगल भागातील नैसर्गिक पाणवठे साफ करून वन्यजीवांना जीवदान देण्याचे काम करीत आहेत.

मार्च महिन्यातच उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढत असताना पारादेखील उच्चांक गाठू लागला आहे. कित्येक ठिकाणी वन्य भागातील नदी, ओढे कोरडे पडल्याने सध्याच्या उन्हाच्या तीव्रतेमुळे काही वन्यजीवांचा पाण्याअभावी मृत्यू होण्याच्या प्रमाणात वाढत आहेत. सध्याचा असह्य होणारा उन्हाळा यामुळे वाढलेली उन्हाची तीव्रता यामुळे वन्यप्राणी पशुपक्षी यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे.

यावर उपाय म्हणून अलिबाग उपवनसंरक्षक राहुल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली परिक्षेत्र पेण अंतर्गत येणाऱ्या महालमिऱ्या डोंगर, सावरसई, गागोदे, अघई, निफाडवाडी, मोहिली येथील येणाऱ्या जंगलातील नैसर्गिक पाणवठे साफ करण्याचे काम वनक्षेत्रपाल, वनपाल, वनरक्षक, वनमजूर तसेच लोकसहभागातून करण्यात येत आहेत.



# मतदार जनजागृतीसाठी गीतमाला निर्मिती

## जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सिडीचे प्रकाशन

**रायगड : प्रतिनिधी**

जिल्ह्यात लोकसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. यंदाच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून मतदार जनजागृतीसाठी गीतमाला तयार करण्यात आली आहे. या गीतांच्या सिडीचे प्रकाशन जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित या प्रकाशन सोहळ्यास अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन महेश पाटील, तहसीलदार म्हसळा, समीर घारे आदी उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यात मतदार जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मतदान प्रक्रिया हा लोकशाहीचा उत्सव आहे. या उत्सवात प्रत्येक मतदाराने मतदान करून आपला सहभाग नोंदवावा यासाठी या गीतांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे. श्रीवर्धन विधानसभा मतदार संघाचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार समीर घारे यांनी या गीतांची निर्मिती केली आहे.

एकूण सहा गीते असून पारंपरिक चालीवर असलेल्या या गीतांचे लेखन, गायन भिमराव सूर्यतळ यांनी केले असून संगीत सचिन धोंडगे यांनी दिले आहे. सहकलाकार म्हणून प्रतिक निकम, आदेश डेरवणकर आणि किरण शिंदे यांनी काम केले आहे. या गीतमाला सिडीची निर्मिती नायब तहसीलदार धर्मराज पाटील, तहसिलदार समीर घारे यांनी केली आहे. ही संपूर्ण निर्मिती शासकीय अधिकारी कर्मचारी यांची आहे.

या उत्कृष्ट निर्मितीसाठी संपूर्ण यंत्रणेचे जिल्हाधिकारी जावळे यांनी कौतुक करून अभिनंदन केले. रायगड जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक ठिकाणी या गीतांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येणार आहे.

# रायगडात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून रायगड जिल्ह्यामध्ये ५ मे रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती असे न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमोल शिंदे यांनी दिली आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलंबित प्रकरणे, तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.

५ मे रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ए. एस. राजंदेकर यांनी केले आहे.

# खांदेरी किल्ल्यावरून परतणारी बोट उलटली; सुदैवाने जीवितहानी नाही

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

खांदेरी किल्ल्यावरील वेताळाचे दर्शन घेऊन परतणारी बोट समुद्रात उलटल्याची घटना रविवारी (दि.३१) घडली. सुदैवाने जीवितहानी टळली. खवळलेल्या समुद्रातील पाण्यामुळे हा प्रकार घडला असल्याची माहिती समोर येत आहे.

तालुक्यातील थळपासून काही अंतरावर खोल समुद्रात खांदेरी किल्ला आहे. या किल्ल्यात वेताळ देवाचे मंदिर आहे. साखर–आक्षीमधील काही तरुण रविवारी बोटीतून वेताळ देवाच्या दर्शनासाठी गेले होते. देवाचे दर्शन घेऊन झाल्यावर ते परतीच्या मार्गावर निघाले. किल्ल्यापासून काही अंतरावर गेल्यावर खवळलेल्या समुद्रातील पाण्यामध्ये बोट पलटी झाली. बोटीतील सुमारे १५ तरुण पाण्यात पडले, मात्र त्यांनी पोहत किनारा गाठल्याने सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असल्याची माहिती समोर येत आहे.

# एसके वॉटर पार्क पर्यटकांचे आकर्षण



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यात खर्डी बुद्रुक गावच्या हद्दीत एसके वॉटर पार्क पर्यटक तसेच विद्यार्थ्यांचे आकर्षण आहे. या वॉटर पार्कचे उद्घाटन मंगळवारी (दि.२) दक्षिण रायगड जिल्हा शिवसेना प्रमुख प्रमोद घोसाळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे संजय करकरे, सुशांत करकरे, प्रशांत करकरे यांनी स्वागत केले.

या वॉटर पार्कला आमदार भरत गोगावले यांनी शुभेच्छा दिल्या. उद्घाटन कार्यक्रमासाठी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, दाखणे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विश्वास उभारे, युवासेना जिल्हा प्रमुख विपुल उभारे, पंचायत समिती माजी सभापती संगीता बक्कम, साले ग्रामपंचायतीचे माजी सरपंच संजय बक्कम, रवींद्र भिकू मोरे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, दिलीप जाधव, व्यापारी घनशाम शेट, नगरसेवक अजित तारळेकर, कपिल गायकवाड, दाखणे माजी सरपंच नरेश सावंत, संदिप नागे, संजय पाटील यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# माणगावात शासकीय अध्यापिका विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शासकीय अध्यापिका विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा उत्साहात साजरा झाला. तब्बल २९ वर्षानंतर भेट झाल्याने मैत्रिणींचा आनंद गगनात मावेनासा झाला.

आई वाकडाची मंदिर सान्निध्यात असलेल्या लिव्हर लँड या रिसॉर्टमध्ये माणगावमधील विनया जाधव, शुभांगी येलवे, स्मिता पाबरेकर यांनी अमर जाधव यांच्या सहकार्याने नियोजन केले होते. दोन दिवसांचा हा कार्यक्रम अतिशय उत्साही व



आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला.

रात्रीची उल्हासित गाण्यांची मैफिल, डान्स, मनातील व्यक्त झालेले भाव एकवटण्यात दुपारचे जेवण, धुरी बहिणींची फणसाची भाजी आणि सोलकढी कोकणातील काजूची भाजी आणि बाप्पाचे प्रिय मोदक सगळे माहेरवाशिणीचा सण साजरा करीत होळीचे रंग उधळत दुपार झाली आणि घराकडे पाखरे परतीला निघाली. एक क्षण आठवणींचा एका डोळ्यात पाणी आणि एका डोळ्यात आनंद की, ही भेट अविस्मरणीय करण्यात आपण एक छोटा हिस्सा आहेत.

कानाकोपऱ्यातील मैत्रिणींनी काही दिवसांत पुन्हा भेटूया असे सांगत साश्रूनयनांनी एकमेकींचा निरोप घेतला.

# नवीन पालवीने माथेरानच्या सौंदर्यात भर

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरान हे डोंगरावर वसलेले असून या माथेरानच्या जंगलातील झाडे हि वर्षभर वेगवेगळा अनुभव देत असतात. प्रामुख्याने वसंत ऋतूमध्ये फुटणारी नवीन पालवी आणि त्यानंतर वेगेवेगळ्या रंगांची छाया माथेरानच्या डोंगरात अनुभवता येते. वसंत ऋतू ते वैशाख या काळातील झाडांमधील बदलाचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासक व पर्यटकांच्या फेऱ्या वाढणार आहेत.



होळीपासून वसंताला सुरुवात झाली. तेव्हापासून माथेरानमधील निसर्ग मुक्तहस्ताने रंगांची उधळण करताना दिसत आहे. लांबलेली थंडी काहीशी कमी होत असताना नेरळ माथेरान घाटात नांगरखिंड परिसरात असलेली पळसाची झाडे फुलली आहेत. रानमोगऱ्याची फुलेदेखील या जंगलातील निसर्गाच्या शृंगारात भर घालताना दिसत आहेत. जिल्ह्यातील निसर्गाचा वरदहस्त लाभलेले आणि निसर्गवैभवाची मुक्तहस्ताने उधळण झालेल्या माथेरानच्या जंगलातील अनेक वृक्षात वेगळ्या बदलाच्या संक्रमणात असल्याचे दिसून येते. झाडांची पाने मागील महिन्यात गळून गेली आहेत. त्यानंतर आता नवीन पाळावी फुटली असून माथेरान आणि त्याच्या अवतीभवतीच्या निसर्गात गेल्या काही दिवसांपासून डोळ्यांना सुखद अनुभव देणारे चित्र नजरेस पडते आहे. वृक्षांनी आपले रूपडे पूर्णतः पालटून टाकले आहे. हिरव्या गच्च असणार्या झाडांमधून कोवळी पालवी धारण करून रंगीबेरंगी छटा दिवसागणिक दिसत आहे.

वसंत सुरू झाला असून आता कोवळी पाने काही दिवसांनी गडद लाल पाने असे रंग बदलून पुन्हा आपल्या हिरव्या रंगाकडे मार्गक्रमण करत पाने पूर्वावस्था धारण करतात. निसर्गाचा हा प्रवास निसर्ग प्रेमींसाठी पर्वणी ठरत आहे.

# प्रवासादरम्यान पर्समधून साहित्य चोरी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

प्रवासादरम्यान लेडीज पर्समधून दागिने व घड्याळ चोरी झाल्याची घटना घडली असून रेवदंडा पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ज्योती श्रीधर पाटील (वय ४८) या २९ मार्च रोजी माणगावहून सायकांळी ४.१५वा.चे सुमारास महाजने येथे पोहचल्या. या वेळी त्यांच्या हातात असलेल्या बँगेत तपासली असता, बॅगेतील सोन्याचे दागिने व घड्याळ असे अंदाजे एक लाख ८२ हजार ५२६ रूपये किंमतीचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याचे आढळले. याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे.

# खोपोली नगरपालिका हद्दीतील फुटपाथ खचले

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील वार्ड क्रमांक १२मधील आरडी कॉम्प्लेक्स प्रवेशद्वारासमोरील मार्गावरील फुटपाथ कोसळल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. याबाबतची तक्रार २० फेब्रुवारी रोजी देऊनही पालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

आरडी नगरकडे जाणाऱ्या मार्गावर सार्वजनिक शौचालय असून या शौचालयाकडे जाणारे फुटपाथ गटारावर आहे. ते खचले असून, शौचालयकडे जाताना येथे नागरिकांना कसरत करावी लागते, असे दिलीप वाघुले यांनी सांगितले.

अलिकडेच खरेदीसाठी आलेल्या ज्येष्ठ नागरिक शौचालयाकडे जाताना गटारात पडल्याने जखमी झाल्याचे त्यांनी सांगितले. शौचालयाचे दरवाजेही तुटलेले असून महिला वर्गाची कुचंबणा होत असल्याचे त्यांनी सांगितले.



# राजस्थानने मुंबईला नमवले

## विजय मिळवत गुणतालिकेत अव्वल स्थान



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२४मधील १४वा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर सोमवारी (दि.१) पार पडला. या सामन्यात मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स संघात खेळला ज्यामध्ये राजस्थानने मुंबईचा सहा विकेट्सनी पराभव करीत सलग तिसरा विजय नोंदविला. त्याचबरोबर गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना मुंबईने राजस्थानला १२६ धावांचे लक्ष्य दिले होते, जे राजस्थानने रियान परागच्या अर्धशतकाच्या जोरावर १५.३ षटकांत सहज पार केले. राजस्थान रॉयल्सकडून रियान परागने सर्वाधिक धावा केल्या. रियान पराग ३९ चेंडूत ५४ धावा करून नाबाद परतला. त्याने आपल्या खेळीत ५ चौकार आणि ३ षटकार मारले. सलामीवीर यशस्वी जैस्वालने १० धावा केल्या. जोश बटलर १३ धावा करून बाद झाला. राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसन १२ धावा करून आकाश मधवालचा बळी ठरला. रवी अश्विनने १६ धावांचे योगदान दिले, तर शुभम दुबे ८ धावा करून नाबाद परतला. मुंबई इंडियन्ससाठी आकाश मधवाल सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. आकाश मधवालने ४ षटकांत २० धावा देत ३ बळी घेतले, तर क्वेना माफाकाला एक यश मिळाले.

तत्पूर्वी, राजस्थान रॉयल्सचा कर्णधार संजू सॅमसनने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या मुंबई इंडियन्सची सुरुवात खूपच खराब झाली. मुंबई इंडियन्सचे फलंदाज ठराविक अंतराने पॅव्हेलियनमध्ये परतत राहिले. रोहित शर्माशिवाय नमन धीर आणि डेवाल्ड ब्रेविस यांना खाते उघडण्यात अपयश आले. या संघाचे ४ फलंदाज २० धावांपर्यंत पॅव्हेलियनमध्ये परतले, मात्र यानंतर हार्दिक पंड्या आणि तिलक वर्मा यांनी चांगली भागीदारी केली. हार्दिक पंड्या २१ चेंडूत ३४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. तर तिलक वर्माने २९ चेंडूत ३२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली.

**ट्रेंट बोल्ट आणि युजवेंद्र चहलची घातक गोलंदाजी**

राजस्थान रॉयल्ससाठी ट्रेंट बोल्ट आणि युजवेंद्र चहल हे सर्वात यशस्वी गोलंदाज ठरले. ट्रेंट बोल्ट आणि युजवेंद्र चहलने ३-३ बळी घेतले. याशिवाय नांद्रे बर्गरने दोन फलंदाजांना आपले बळी बनवले, तर आवेश खानने पियुष चावलाला बाद केले. या सामन्यात ट्रेंट बोल्टने एक मोठा विक्रम नोंदवला. तो आयपीएलमधील पहिल्या षटकांत सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज ठरला आहे. त्याने याबाबत भुवनेश्वर कुमारला मागे टाकले.



# राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत महाराष्ट्राला दुहेरी मुकुट

### पुरुषांमध्ये ३९वे, तर महिलांमध्ये २५वे जेतेपद

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी (पुरुष व महिला) राष्ट्रीय खो-खो स्पर्धेमध्ये अपेक्षेप्रमाणे कामगिरी करताना अजिंक्यपदावर मोहोर उमटवली. महाराष्ट्राच्या पुरुषांच्या संघाने रेल्वे संघावर, तर महाराष्ट्राच्या महिला संघाने भारतीय विमान प्राधिकरण संघावर विजय साकारत झळाळता करंडक पटकावला. पुरुषांचे हे ३९ वे, तर महिलांचे २५ वे जेतेपद ठरले.

नवी दिल्ली येथील करमाळी सिंग क्रीडांगण येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राने डबल धमाका केला. गेल्या काही वर्षांतील रेल्वेचा दबदबा या वर्षी महाराष्ट्राने मोडून काढला. या वर्षी महाराष्ट्राने तिन्ही विभागांत विजेतेपद मिळवताना एकूण सहा अजिंक्यपद मिळवली. यामध्ये सब ज्युनिअर गटातील दोन व ज्युनिअर गटातील दोन व खुल्या गटातील दोन अशा एकूण सहा विजेतेपदांचा समावेश आहे.

महिला विभागातील अंतिम सामन्यात महाराष्ट्राने भारतीय विमान प्राधिकरणावर ३.२० मि. राखून सहज दोन गुणांनी पराभव केला. महाराष्ट्राच्या प्रियांका इंगळे (२.२०, २.२० मि. संरक्षण व ४ गुण), संपदा मोरे (१.१०, १.४० मि. संरक्षण), अश्विनी शिंदे (२.१०, १.१० मि. संरक्षण व ४ गुण), काजल भोर (६ गुण) यांनी छान खेळ केला.

## किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा

# महाराष्ट्राचा मुलींचा संघ बाद फेरीत दाखल



**पाटणा : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राने ३३व्या किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेतील शेवटच्या साखळी लढतीत ओरिसाचा ५९-१९ असा पराभव करीत बाद फेरी गाठली. उपउपांत्यपूर्व फेरीत महाराष्ट्राचा सामना आता गतराष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या उत्तर प्रदेश संघाशी होईल.

पटना, बिहार येथील पाटली पुत्र क्रीडा संकुलात सुरू असलेल्या या स्पर्धेतील फ गटातील शेवटच्या साखळी सामन्यात महाराष्ट्राने आक्रमक सुरुवात करीत चौथ्या मिनिटाला लोण देत १०-००अशी आघाडी घेतली.

सलग १५ गुण गमविल्यानंतर ओरिसाने मोनिका पवारची अव्वल पकड करीत आपले गुणांचे खाते उघडले, पण महाराष्ट्राने पुन्हा दुसरा लोण देत आपली आघाडी २१-०३ अशी वाढविली. मध्यांतराला महाराष्ट्राकडे ३०-१० अशी आघाडी होती.

उत्तरार्धात आणखी दोन लोण देत महाराष्ट्राने गुणांचे अर्धशतक पार केले. बिंदिसा सोनार, मोनिका पवार यांच्या झंझावाती चढाया त्याला उजवा कोपरा रक्षक साक्षी जाधवची मिळालेली पकडीची साथ यामुळे महाराष्ट्राने हा सामना मोठ्या फरकाने जिंकला. महाराष्ट्राला पहिल्या चार संघात स्थान मिळवायचे असेल, तर आपला बचाव अधिक भक्कम करावा लागेल.

इतर निकाल संक्षिप्त : १) ह गट हिमाचल प्रदेश वि. वि. मध्य प्रदेश(३४-२८), २)अ गट हरियाणा वि. वि. भारतीय क्रीडा प्राधिकरण-साई(३१-१३), ३) क गट उत्तर प्रदेश वि. वि. आसाम (३६-१८), ४)फ गट उत्तरांचल वि. वि. कर्नाटक(४९-२८).

## दिलीप करंगुटकर स्मृती शालेय कॅरम स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे क्रीडा सल्लागार व जे.जे. रुग्णालय परिसरातील नवरात्र महोत्सव मंडळाचे माजी सरचिटणीस स्व. दिलीप करंगुटकर यांच्या तृतीय स्मृतीदिनानिमित्त शनिवारी (दि.६) भायखळा येथे विनाशुल्क शालेय कॅरम स्पर्धा आयोजित केली आहे. १५ वर्षांखालील शालेय मुलामुलींसाठी होणाऱ्या मोफत एकेरी कॅरम स्पर्धेतील आठ विजेत्यांना आकर्षक चषक-पदक व स्ट्रायकर देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

खेळाडूंनी मोफत प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी चंद्रकांत करंगुटकर (९९८७८३१६२२), क्रीडाशिक्षक अविनाश महाडिक (९००४७५४५०७) यांच्याकडे ४ एप्रिलपर्यंत संपर्क साधावा.

# सामन्यादरम्यानच चाहता आला मैदानात

### घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माला राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यात पहिल्याच चेंडूवर बाद झाला, तर मुंबई इंडियन्सचा संपूर्ण संघ केवळ १२५ धावाच करू शकला. मुंबई इंडियन्सचा संघ जेव्हा क्षेत्ररक्षणासाठी उतरला तेव्हा रोहित मैदानावर असतानाच एकदम दचकला, ज्याचा व्हिडिओ सध्या व्हायरल होत आहे.

वानखेडे मैदानावरील सुरक्षेला चकवा देत एका प्रेक्षकाने मैदानात लाइव्ह सामन्यात प्रवेश केला. स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करीत असलेल्या रोहितला मागून एका चाहत्याने येऊन मिठी मारण्याचा प्रयत्न केला आणि त्याची गळाभेट घेतली, तर त्याने नंतर इशान किशनची गळाभेट घेत आनंद साजरा केला.

रोहित शर्मा आणि यष्टिरक्षक इशान किशन स्लिपमध्ये उभे होते. तेवढ्यात त्यांच्या मागून एक चाहता धावत आला. त्याला पाहून रोहित शर्मा अचानक घाबरला, मग तो प्रेक्षक असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याने रोहितला काहीतरी सांगितले आणि मग त्याला मिठी मारली. यानंतर त्याने सोबत उभ्या असलेल्या ईशान किशनचीही गळाभेट घेतली आणि स्वतः ही बाहेर जाण्यासाठी धावत निघाला. तितक्यात सुरक्षारक्षक त्याच्याजवळ धावत आले आणि त्याला मैदानाबाहेर घेऊन गेले.



# मुंबई इंडियन्सच्या पराभवानंतर इरफान पठाणने सुनावले



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सची स्पर्धेत सुरुवात नेहमीच पराभवांनी होताना दिसते. सुरुवातीचे सामने जिंकण्यात संघाला नेहमीच अपयश येते. या वेळीही सारखीच परिस्थिती आहे, पण फरक एवढाच आहे की, आता कर्णधारपद रोहित शर्माऐवजी हार्दिक पांड्याकडे आहे. चाहत्यांसह अनेक क्रिकेटप्रेमींचे लक्ष आधीच वेधून घेतलेला हार्दिक पंड्या मुंबई इंडियन्सला सलग तिसऱ्या सामन्यात विजय मिळवून देऊ शकला नाही.

राजस्थानविरूद्धच्या या पराभवानंतर भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू इरफान पठाणने एक ट्विट केले आहे, ज्यात त्याने कोणाचे नाव न घेता निशाणा साधला.

मुंबई आणि राजस्थान सामन्यादरम्यान आणि सामना झाल्यानंतरही इरफान पठाणने एकामागून एक अनेक ट्विट केले. ज्यामध्ये त्याने रियान परागच्या फलंदाजीचे मनापासून कौतुक केले. जसप्रीत बुमराहला पहिले षटक देण्याच्या निर्णयाचे कारण सांगितले. इरफानने म्हटले, 'तुमच्या नेत्याने सर्वात कठीण परिस्थितीत कामगिरी करावी, असे तुम्हाला नेहमीच वाटते. जर त्याने असे केले नाही तर तो त्याच्या संघाचा मान मिळवू शकणार नाही.'

# रियान परागचे आईने केले कौतुक; लेकाला पुन्हा घातली ऑरेंज कॅप



**मुंबई : प्रतिनिधी**

राजस्थान रॉयल्सचा फलंदाज रियान पराग यंदाच्या आयपीएल हंगामात जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. त्याने आतापर्यंत खेळलेल्या तीन सामन्यात १८१वा केल्या असून त्याने ऑरेंज कॅप मिळवली आहे. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यात त्याने शानदार फलंदाजी करत ५४ धावांची नाबाद खेळी करीत राजस्थान रॉयल्सला हंगामातील सलग तिसरा विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. यानंतर जेव्हा तो त्याच्या टीम हॉटेलमध्ये गेला, तिथे रियानची आई त्याची वाट पाहत होती. रियान जेव्हा आईला भेटला तेव्हाचा क्षण पाहण्यासारखा होता. राजस्थान रॉयल्सने हा व्हिडिओ शेअर केला आहे.

सामना संपल्यानंतर रियान पराग टीम हॉटेलमध्ये पोहोचला तेव्हा त्याची आई तिथे उपस्थित होती. आईला पाहताच रियानच्या चेहऱ्यावरही आनंद दिसला. आपल्या मुलाला पाहताच रियानच्या आईने त्याला जवळ घेतले. आई लहान बाळाला जशी कुरवाळते आणि त्याचे लाड करते, तसाच तो क्षण होता. यानंतर त्याच्या आईने रियान परागच्या बॅगमधून त्याला मिळालेली ऑरेंज कॅप काढली आणि स्वतच्या हाताने त्याला घातली. रियान परागचा हा व्हिडिओ राजस्थान रॉयल्सने त्यांच्या सोशल मीडियावर शेअर केला आहे.

# वानखेडे स्टेडियमवर भारताचा विश्वविजय

## चाहत्यांनी केल्या २०११च्या वनडे वर्ल्डकपच्या आठवणी ताज्या



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाने २ एप्रिल २०११ रोजी वनडे वर्ल्डकपच्या अंतिम सामन्यात श्रीलंकेला पराभूत करीत २८ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर विश्वविजेतेपदावर नाव कोरले होते.

सचिनचा हा सहावा वनडे वर्ल्डकप होता आणि अखेरचाही. त्यामुळे त्याला त्याच्याच घरच्या मैदानावर वर्ल्डकप जिंकून एक अविस्मरणीय भेट संघाने दिली होती. अंतिम सामन्यात पहिल्यांदा नाणेफेक झाली, पण त्या वेळी कर्णधारांनी दिलेला कॉल सामन्याधिकाऱ्यांना ऐकूच गेला नाही. त्यामुळे दुसऱ्यांदा नाणेफेक घेण्यात आली, या वेळी श्रीलंकेचा कर्णधार कुमार संगकाराने नाणेफेक जिंकली आणि प्रथम फलंदाजी निवडली, पण झहीर खानने सलामीवीर उपुल थरंगाला दोन धावांवरच माघारी धाडले.

त्यानंतर तिलकरत्ने दिलशान आणि संगकारा डाव सांभाळत होते, परंतु दिलशानचा अडथळा हरभजन सिंगने त्याचा ३३ धावांवर त्रिफळा उडवत दूर केला, मात्र यानंतर संगकारा आणि माहेला जयवर्धने हे एकत्र आले आणि त्यांनी भारतीय गोलंदाजांवर वर्चस्व गाजवण्यास सुरुवात केली. त्यांनी ६२ धावांची भागीदारी केली. त्या वेळी कर्णधार धोनीने युवराज सिंगच्या हातात चेंडू सोपवला आणि ही चाल कामी आली. युवीने संगकाराला ४८ धावांवर माघारी धाडले. तरी जयलवर्धनेने थिलन समरविराला साथीला घेतले आणि अर्धशतकी भागीदारी केली, परंतु समरविरालाही युवराजनेच पायचीत केले, पण तोपर्यंत श्रीलंकेने १७० धावांचा टप्पा पार केला होता.

अखेरीस जयवर्धनेला नुवाल कुलसेखरा आणि थिसरा परेरा यांनी अनुक्रमे ३२ आणि २२ धावा करत साथ दिली. परेराने ९ चेंडूतच २२ धावांनी छोटेखानी पण आक्रमक खेळी केली, तसेच जयवर्धनेनेही शकत केले. त्यामुळे श्रीलंकेला ५० षटकांत ६ बाद २७४ धावांपर्यंत मजल मारण्यात यश मिळाले. त्या वेळी २७५ ही मोठी धावसंख्या समजली जात होती. भारताकडून गोलंदाजीत झहीर आणि युवराजने प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या होत्या, तर हरभजनने एक विकेट घेतलेली.

दरम्यान, श्रीलंकेने दिलेल्या २७५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी भारताकडून विरेंद्र सेहवाग आणि सचिन तेंडुलकर ही जोडी मैदानात उतरली, पण डावाच्या दुसऱ्याच षटकात लसिथ मलिंगाने भारताला मोठा धक्का दिला. त्याने विरेंद्र सेहवागला भोपळाही फोडू न देता माघारी धाडले. पाठोपाठ ७व्या षटकात सचिनही मलिंगाविरुद्धच खेळताना १८ धावा करून यष्टीरक्षक संगकाराकडे झेल देत बाद झाला. भारताने दोन्ही अनुभवी सलामीवीरांच्या विकेट्स लवकर गमावल्या होत्या, पण नंतर गौतम गंभीरला साथ मिळाली ती युवा विराट कोहलीची.

याच वेळी भारतीय संघव्यवस्थापनाने चाल खेळेली आणि कर्णधार धोनी फलंदाजीत बढती घेत पाचव्याच क्रमांकावर फलंदाजीला उतरला. त्याने आणि गंभीरने मग श्रीलंकेच्या गोलंदाजांवर वर्चस्व ठेवले. या दोघांनीही एकमेकांना उत्तम साथ देत बघता-बघता त्यांच्यात शतकी भागीदारीही झाली. विजय काही अंतरावरच होता, परंतु, अचानक माशी शिंकली आणि १०९ धावांची भागीदारी झालेली असतानाच परेराने गंभीरला त्रिफळाचीत केले. गंभीरचे शतक अवघ्या ३ धावांनी हुकले. गंभीर १२२ चेंडूत ९७ धावांवर बाद झाला. तो बाद झाला, तेव्हा भारताला ५२ चेंडूत ५२ धावांची गरज होती. त्या वेळी धोनीला साथ देण्यासाठी इनफॉर्म युवराज सिंग फलंदाजीला उतरला. त्याने आक्रमक खेळणाऱ्या धोनीला चांगली साथ दिली.

धोनीनेही नंतर मोठे शॉट्स खेळले. त्यामुळे विजय भारताच्या अगदी जवळ आला होता. ११ चेंडूत भारताला अवघ्या ४ धावांनी गरज होती. याचवेळी धोनीने नुवान कुलसेखराच्या गोलंदाजीवर हेलिकॉप्टर शॉट खेळत खणखणीत षटकार ठोकला अन् समालोचन करणाऱ्या रवी शास्त्री यांच्या तोंडून 'धोनी फिनिशेस ऑफ इन स्टाईल' हे ऐतिहासिक वाक्य ऐकू आले.

## आयपीएलच्या वेळापत्रकात झाले दोन बदल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२४च्या वेळापत्रकातील दोन सामन्यांमध्ये बदल करण्यात आला आहे. आता आयपीएलने त्यांच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरून ही माहिती दिली आहे. १६ आणि १७ एप्रिलला होणाऱ्या दोन सामन्यांमध्ये हा बदल करण्यात आला आहे. कोलकाता नाईट रायडर्स विरूद्ध राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स विरूद्ध दिल्ली कॅपिटल्स या संघाचे सामने यादिवशी होणार आहेत.

कोलकाता नाईट रायडर्स विरूद्ध राजस्थान रॉयल्सचा सामना पूर्वी १७ एप्रिलला होणार होता, पण आता हा १६ एप्रिलला खेळवला जाणार आहे. या सामन्याच्या ठिकाणामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. गुजरात टायटन्स विरूद्ध दिल्ली कॅपिटल्स हा सामना १६ एप्रिलला खेळवला जाणार होता, आता हा सामना १७ एप्रिल रोजी नरेंद्र मोदी स्टेडियम अहमदाबाद येथे खेळवला जाईल. दोन्ही संघांच्या सामन्यांच्या तारखांमध्ये हा बदल करण्यात आला आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com